मंगळवार, १४ नोव्हेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ९८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६


# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

ज्योतिर्मय दिवाळी विशेषांक


● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 14 NOV. 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-98 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-20 ● PRICE-10
















आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

adhunikkesari.com Adhunik Kesari

ज्योतिर्मय दिवाळी विशेषांक

मंगळवार, १४ नोव्हेंबर २०२३


# सोन्याची जेजुरी



महाराष्ट्राचे लोकदैवत जेजुरीच्या खंडोबा देवाच्या सोमवारी झालेल्या सोमवती अमावास्या यात्रेत लाखो भविकांनी गर्दी केली होती. सकाळी सात वाजता पालखीची मंदिराला प्रदक्षिणा घालून कऱ्हा नदीवर प्रस्थान होतानाचे ड्रोनच्या नजरेतून घेतलेले दृश्य. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# सरकारचा निषेध करत शेतकऱ्यांनी स्मशानभूमीत केली दिवाळी

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** स्मशानभूमी म्हटलं की, खूप जणांना भीती वाटते. मात्र जिथे जन्म होतो ते रूग्णालय आणि जिथे या जगाचा निरोप घेतला जातो ते स्मशान भूमी. मात्र काल दि.१३ नोव्हें रोजी सगळे घरी आनंदात दिवाळी साजरी करत असतांना वाकदच्या शेतकऱ्यांनी स्मशानभूमीत दिवाळी साजरी करून अनोख्या पद्तीने सरकारचा निषेध केला.


सगळीकडे दिवाळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातोय. मात्र ज्या ठिकाणी सहसा कोणी जात नाही आणि गेलं तरी आनंद व्यक्त केला जात नाही ते ठिकाण म्हणजे स्मशानभूमी. स्मशानभूमी हा प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य अंग असली तरीही स्मशान भूमीत प्रवेश करणारं प्रत्येक मन हे थोडंतरी बिथरतंच. कारण या ठिकाणी कोणी आनंद व्यक्त करण्यासाठी जात नाही. गेल्या दोन तीन वर्षांपासून शेतकरी मेटाकुटीला आला आहे. अवकाळी पाऊस, त्यातच शेतीमालाला भाव नाही. सरकार सातत्याने निर्यात धोरणात हस्तक्षेप करून शेतीमालाचे भाव पाडत आहे. पिकांचे नुकसान होऊनही शेतकऱ्यांना अद्याप नुकसानभरपाई मिळाली नाही. पीकविमा मिळाला नाही. यावर्षी खरीप हंगाम तर वाया गेलाच मात्र रब्बी हंगामावरही दुष्काळाचे सावट आहे. तत्कालीन सरकारने सन २००५ साली समन्यायी पाणी वाटप कायदा केला त्यामुळे गोदावरी खोऱ्यातील हक्काचे पाणी जायकवाडीला नेले जात आहे. त्यामुळे गोदावरी खोरे वाळवंट बनले आहे. यावर्षीही जायकवाडीला पाणी नेण्याचा घाट घातला जात आहे. पाणी गेले तर यावर्षी गोदावरी खोऱ्यात पिके सोडाच पिण्याला देखील पाणी राहणार नाही. मात्र शेतकऱ्यांच्या समस्यांकडे डोळेझाक करत सरकार त्यांच्याच मस्तीत मशगुल आहे. सत्ताधारी आनंदाने दिवाळी साजरी करत असले तर ग्रामीण जनतेची दिवाळी यावर्षी निरुत्साहात आहे. त्यामुळे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी वाकद येथील ग्रा.प.सदस्य अरुण पाटील, अंबादास वाघ, बाळासाहेब शिंदे, बारकु वाघचौरे, संजय खैरनार, दत्तू रौंदळ, शिवाजी बडवर, रमेश पवार, संदीप पाटील आदी ग्रामस्थांनी शेकडो दिव्यांची आरास करत स्मशानभूमीत दिवाळी साजरी केली.



केंद्र व राज्य सरकारचे धोरण हे नेहमीच शेतकरी विरोधी राहिले . सध्या कोणत्याही शेतीमालाला भाव नाही, खरीप हंगामाबरोबरच रब्बी हंगामही वाया गेला आहे, त्यामुळे शेतकरी अडचणीत आले असून कर्जबाजारी झाले आहेत . त्यामुळे राज्यसरकारने घोषित केलेली अपूर्ण कर्जमाफी राबवावी तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्यांना तातडीने अनुदान जमा करावे .
**– अरुण पाटील, माजी चेअरमन, ग्रा .प .सदस्य**


यशाची रोशनी, समाधानाचा फराळ,
मंगलमय रांगोळी, मधुर
मिठाई, आकर्षक आकाशकंदिल,
आकाश उजळवणारे फटाके, येत्या
दिवाळीत, हे सगळं तुमच्यासाठी !!
शुभ दीपावली
दिपावली निमीत्त
हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
संदिप गोविंदराव गौड
कोंडलवार


शुभ दिपावली
सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपूर संचालित
1) सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
2) शंकरराव बेझलवार कला, वाणिज्य महाविद्यालय, अहेरी, जि. गडचिरोली
3) शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
4) सौ. सुशिलाबाई रामचंद्र मामीडवार समाजकार्य महाविद्यालय, पडोली
5) सौ. लिना किशोर मामीडवार इन्स्टीटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲण्ड रिसर्च, कोसारा, चंद्रपूर
6) नेहरू विद्यालय, चंद्रपूर
7) इंदिरा विद्यालय, वरूर रोड
8) श्री. साईनाथ विद्यालय, कढोली
9) गुरूनानक विद्यालय, विरूर (स्टे)
10) आदर्श किसान विद्यालय, नारंडा
11) सरस्वती विद्यालय, वढोली
दिपावली- 2023
च्या हार्दिक शुभेच्छा...
श्रीमती सुधाताई पोटदुखे
अध्यक्ष
सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपूर


दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स् फेडरेशन लि.,मुंबई यांचे कडून सन् 2023 करिता "सर्वोत्कृष्ट बँक" म्हणून द्वितीय पुरस्कार प्राप्त
सन २०२२-२३ मध्ये बँको एव्हीएस पब्लिकेशन, कोल्हापूर यांनी बँकेला
BANCO BLUE RIBBON AWARD 2023 द्वितीय पुरस्कार प्राप्त
श्री कन्यका नागरी सहकारी बँक लि.,चंद्रपूर
(रजि.नं.सीएचडी/बीएनके/147)
मुख्यालय : पहिला माळा, रघुवंशी कॉम्प्लेक्स, सिटी हायस्कूल मागे, बाजार वार्ड, चंद्रपूर - 442402 फोन : 07172-261049, फॅक्स नं. 07172-261328, E-mail: ho-chd@kanyakabank.com
दि.३१/३/२०२३ अखेर बँकेची स्थिती (रू.लाखात)
ठेवी - 55854.38
कर्ज- 39635.52
सी.आर.ए.आर.- 18.13%
निव्वळ एन.पी.ए. 00.00%
निव्वळ नफा - 1056.08
ऑडीट वर्ग - "अ"
* श्री कन्यका विशेष ठेव योजना
• 750 दिवसांकरिता सर्वांसाठी - 7.50%
• जेष्ठ नागरिकांसाठी - 8.00%
हाऊसिंग कर्ज 9.00%
वाहन कर्ज 9.00%
सॅलरी लोन 10.00%
डॉक्टर करिता कर्ज 9.50%
शैक्षणिक कर्ज 10.00%
कॅश क्रेडिट (महिला करिता) 9.00%
बँकेतील जेष्ठ नागरिकांना MIS ठेवीवर दरमाह व्याज घरपोच मिळेल.
बँकेच्या उपलब्ध सेवा
RTGS & NEFT
सेफ डिपॉझिट लॉकर्स
ATM
जनरल इन्शुरन्स
डॉ. विजय आईंचवार
अध्यक्ष
श्री संतोष चिल्लरवार
उपाध्यक्ष
श्री दिपक गुंडावार संचालक
श्री राजीव गोलीवार संचालक
श्री सुभाष कासनगोट्टूवार संचालक
सौ. वसुधा कंचर्लावार संचालिका
श्री सुमेध कोतपल्लीवार संचालक
श्री जयंत बोंगीरवार संचालक
सौ. प्रतिक्षा चिरेवार संचालिका
श्री उमेश वासलवार संचालक
डॉ. सुनित साकुरे संचालक
श्री नारायण पद्मावार संचालक
श्री अविनाश उत्तरवार संचालक
श्री दिपक चाडावार संचालक
श्री सुहास माडूरवार संचालक
डॉ.कल्पना कवाडे संचालिका
श्री विलास वेगीनवार संचालक
सी.ए.अजय मामीडवार तज्ञ संचालक
श्री उदय बुग्गावार संचालक
श्री अशोक देसाई मुख्यकार्यकारी अधिकारी
श्री नितीन आईंचवार
बँकेचे ग्राहक आणि भागधारक यांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा


तमाम जनतेस दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा
खा. प्रताप पाटील चिखलीकर
शुभेच्छुक
गणपत पीट्टेवाड
पोमनाळकर
अध्यक्ष भाजपा जिल्हा
ओबीसी मोर्चा
(नांदेड उत्तर) जि. नांदेड
गणपत पीट्टेवाड पोमनाळकर
भाजपा जिल्हा ओबीसी मोर्चा, अध्यक्ष (नांदेड उत्तर), जि. नांदेड

## ब्रेव्हरमन यांची हकालपट्टी

आधुनिक केसरी

ब्रिटनच्या गृहमंत्री सुएला ब्रेव्हरमन यांची गृहमंत्री पदावरुन हकालपट्टी करण्यात आली आहे. ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी हा निर्णय घेतला आहे. लंडनच्या 'द टाइम्स' या वृत्तपत्रात सुएला ब्रेव्हरमन यांनी एक लेख लिहिला होता. त्यात लंडनची पोलीस यंत्रणा पॅलेस्टाईन धार्जिणी आहे असा आरोप केला होता. तसंच येथील यंत्रणेला कायदा सुव्यवस्थेची चिंता नाही असंही लेखात म्हटलं होतं. त्यामुळेच आता त्यांना गृहमंत्रीपदावरुन हाकलण्यात आलं आहे. सुएला ब्रेव्हरमन यांनी जेव्हा द टाइम्समध्ये लेख लिहून पोलिसांवर आणि पोलीस यंत्रणेवर आरोप केला त्यानंतर विरोधकांनी त्यांच्या विरोधात कारवाईची मागणी केली होती. लंडनमधल्या रस्त्यावर उतरुन टीकाकारांनी आणि विरोधकांनी सुएला ब्रेव्हरमन यांच्या विरोधात निदर्शनं केली होती. त्यानंतर आता ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी मंत्रिमंडळात फेरबदल केले आहेत. त्याचवेळी त्यांनी सुएला ब्रेव्हरमन यांची गृहमंत्रीपदावरुन हकालपट्टी केली आहे. ११ नोव्हेंबर हा दिवस युरोपात महत्त्वाचा मानला जातो. १९१९ मध्ये याच दिवशी पहिलं महायुद्ध संपलं होतं. त्या वर्षापासूनच लंडनमध्ये या युद्धात ज्यांचा मृत्यू झाला त्यांच्या स्मरणार्थ विशेष कार्यक्रम आयोजित केले जातात. हा दिवस हुतात्मा दिवस म्हणून साजरा होतो. तसंच शासकीय समारंभही आयोजित केले जातात. शंभरहून अधिक वर्षे ही परंपरा सुरु आहे. याच दिवशी लंडनमध्ये पॅलेस्टाईन समर्थकांचा मेळावा होता. ब्रिटनच्या गृहमंत्री सुएला ब्रेव्हरमन या इस्रायल समर्थक आहेत. त्यामुळे त्यांना हा मेळावा पटला नाही. या मेळाव्याची संमती मागण्यासाठी आलेल्या आयोजकांना गृहमंत्री ब्रेव्हरमन यांचं मत काय आहे? हे विचारात न घेता पोलिसांनी संमती दिली. हुतात्मा दिवसाला गालबोट लागणार नाही आणि शासकीय कार्यक्रमांच्या मध्ये या मेळाव्यामुळे बाधा येणार नाही याची काळजी घ्या अशा दोन अटी घालून पोलिसांनी ही परवानगी दिली. मात्र सुएला ब्रेव्हरमन यांना हे मुळीच आवडले नाही. त्यांनी लंडन पोलीस प्रमुखांना बोलवलं आणि या मेळाव्याला संमती देऊ नये असं सुचवलं. यावर पोलीस प्रमुखांनी विनम्र नकार देत ही संमती रद्द करण्यासाठी काहीही सबळ कारण नाही असं सांगितलं. नियम पाळून हा मोर्चा काढला जाईल असंही सांगितलं. यानंतर चिडलेल्या सुएला ब्रेव्हरमन यांनी द टाइम्समध्ये लेख लिहिला. ज्यानंतर आता त्यांना गृहमंत्री पदावरुन हटवण्यात आलं आहे.

## अनेक विश्वविक्रम देशाच्या नावावर आहेत



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारत हा जागतिक लोकसंख्येच्या तुलनेत नंबर एक वर येऊन सर्वात मोठा विश्व विक्रम केला आहे. तसेच जगातील सर्वात तरुण देश म्हणुनही देशाची जगात ओळख आहे. देशामध्ये मोठे मोठे पुतळे, मोठ मोठे मंदीरे व मंदीरामधील हजारो करोडो रुपयांचे व्यवहार यामध्ये ही भारत जगात नंबर एक आहे. भारत लोकसंख्येच्या दृष्टीने जगात एक नंबर असला तरीही भारत जगाच्या पाठीवर आपला ठसा एक नंबर वर उमटवू शकला नाही हे याची खंत आहे. जग भारताकडून नैतिक व वैचारिक प्रेरणा घेऊन आपली प्रगती करत असताना भारतीय लोक मात्र आपापसात भांडून स्वतः चे बेगडी व दिखाऊ वर्चस्व निर्माण व्हावे म्हणून संघर्ष करत आहेत.**

जगातील सर्वात जास्त लोकसंख्या व तरुणांचा देश हा जर जागतिक विक्रम सोडला तर भारत इतर बाबतीत नंबर एक वर का नाही याची समिक्षा करण्यात भारतीय लोक अपयशी ठरले आहेत. जाती धर्माच्या नावाखाली चुकिच्या लोकांची व्यक्ती पुजा करायची आणि मानसिक प्रगती ला मर्यादित करायचे एवढे काम भारतीय लोक उत्तम प्रकारे करतात. जगातील लोक तथागत गौतम बुद्ध, सम्राट अशोक, बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कडून प्रेरणा घेऊन जिवन जगत आहेत. म्हणुन ते संख्येने जरी कमी असले तरीही आर्थिक, व विकासाच्या दृष्टीने खुप पुढारलेले आहेत. आपण जागतिक महाशक्ती असलेले देश बघितले तर आपल्या सर्व मिळुन आपल्या लोकसंख्या च्या चाळीस टक्के ही लोक संख्या नसेल तरीही ते जगावर राज्य करत आहेत. काही काही देशाची लोक संख्या आपल्या देशातील एका राज्या एवढी आहे तरीही ते भारतापेक्षा वरच्या पायरी वर आहेत. ते का पुढारले याचे उत्तर आपण कधी शोधणार? भारतात सर्वसामान्य पणे लोकांना देश प्रेम देश हित यात काहीच पडलेले दिसत. परंतु आपापल्या सोईनुसार देशाच्या नावाखाली लोकांना भावनिक बनवून देशाचे महत्त्व व देशाचे बद्दल आपुलकी दाखवण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु प्रत्यक्षात आपण राष्ट्रहीताचा किती विचार करतो हे आपल्याला वेगवेगळ्या जागतिक विक्रमावरुन लक्षात येतेच. भारतामध्ये अनेक जाती, धर्माचे लोक, विचार, भाषा, संस्कृती, संस्कार रहाणीमान, खाणपान यावरून ही विविधता असली तरीही भारतीय संविधानाने सर्वांना एकसंघ बांधले आहेत. आणि भारतीय लोक भारतीय संविधानच वाचत नाही यावरून भारतीयांचे राष्ट्रप्रेम उघड उघड दिसून येते. जगाने ज्या बुद्ध, सम्राट अशोक व बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कडून प्रेरणा घेऊन आपली प्रगती केली त्याच महापुरुषांना भारतात जातीत बंद करून त्यांचे विचारावर दुर्लक्ष केले जाते. आणि असे लोक स्वतः ला हुशार, विद्वान समजून जगत असतील तर देशाची अवस्था काय होणार? आपण डोळस मानाने विचार केला तर खरचं प्रगती पथावर आहोत का? याची समीक्षा केली तर अंगावर काटा येईल कारण आपण स्वतःला पुढारलेले समजत असलो तरीही आपण वैचारिक, शैक्षणिक आणि दृष्टीने किती मागास आहोत याची कल्पना येईल. जसे भारत सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. आणि कोणत्याही देशाची प्राथमिक परिस्थिती त्याच्या शिक्षणावरून व शैक्षणिक दर्जावरून ठरली जात असते. मागे काही महिन्यापुर्वी जागतिक विद्यापिठाचा जो अहवाल समोर आला त्या विद्यापिठांच्या पहिल्या शंभर विद्यापिठा मध्ये देशातील एकही विद्यापीठ नाही. म्हणजे आपली शैक्षणिक गुणवत्ता आपण कुठे नेऊन ठेवली याची कल्पना येते. आणि लोकसंख्येने जास्त असलेल्या देशात शिक्षणाची गुणवत्ता च नसेल तर जागतिक पातळीवर त्या देशाला पाहिजे तो सन्मान मिळत नाही. लोकसंख्येच्या बाबतीत एक नंबर असलेला भारत गुणवत्ता पुर्ण शिक्षणात मागे आहेच परंतु आपण साक्षरतेचा विचार केला तर भारत साक्षरतेच्या बाबतीत पहिल्या पाच क्रमांकावर तरी पाहीजे होता परंतु भारताचा जागतिक साक्षरता क्रमवारीत ९४ वा नंबर आहे. जेथे शिक्षण आणि गुणवत्ता च कमी असेल अशा देशाची प्रगती कोणत्या आधारावर होणार? देशातील शिकलेले तरुण विदेशात जाऊन नोकऱ्या करून तिकडचेच स्थायिक होत आहेत, दरवर्षी लाखों लोक देवाचे नागरिकत्व सोडत आहेत. जर देशातील विद्वता बाहेर देशात गेली तर देश प्रगती कशी करेल? विद्वता लोकांना देशातच नोकरी का उपलब्ध होत नाही? हा खुप गंभीर प्रश्न आहे. म्हणून शिक्षण नोकरी व विकासाच्या बाबतीत जागतिक विक्रम नसले म्हणून काय झाले पण अनेक विश्वविक्रम देशाच्या नावावर आहेत. जगातील सर्वात मोठी झोपडपट्टी भारतात असल्याचा बहुमान आपल्याला मिळाला आहे. मुंबई मधील धारावी झोपडपट्टी ही सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणून आजही आहे. जाती धर्माच्या नावाखाली चुकिच्या लोकांची व्यक्ती पुजा करून भारतातील करोडो लोकांना भक्ती करण्यासाठी प्रोत्साहन देऊन रात्रंदिवस फक्त भक्तीमय वातावरण निर्माण होऊन लोकांना देश, शिक्षण, आरोग्य, रोजगार महागाई व जनकल्याणाचे काम यावर जाणीव पुर्वक दुर्लक्ष व्हावे म्हणून ज्या मिडियाने आपल्या पुर्ण प्रामाणिक पणे काम केले म्हणून जागतिक पातळीवर भारतीय मिडिया चे स्थान १८० देशापैकी १६१ व्या नेऊन मिडिया ने स्वतः चा प्रामाणिक पणा व स्वाभाविक सिद्ध करून दिला आहे. भारतातील उद्योगपती जगाच्या पाठीवर काम करून देशाचे नाव पुढे नेत आहेत म्हणून देशाच्या प्रधानमंत्री यांनी त्यांच्या कंपनीणीची जाहिरात करून, विदेशी प्रकल्प मिळून देण्यासाठी देशातील तिजोरी रिकामी करून दिली अशा देशात कुपोषणाचे प्रमाण जगात सर्वात जास्त आहे. उद्योग पती मित्राला सरकारी तिजोरी रिकामी करताना कुपोषण मुलांच्या पालन पोषणाचा विचार न करणारे आज जागतिक पातळीवर नेमका कोणता मुद्दा घेऊन उभे राहतील? देशामध्ये बेरोजगारीचा चुकिचा आकडा देऊन लोकांची दिशाभूल करणाऱ्या देशात उपाशी पोटी मरणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. बेरोजगारी देशात सात आठ टक्के दाखवून रोजगार निर्मिती देशात मोठ्या प्रमाणात आहे असे दाखवले जाते परंतु वास्तविक जेव्हा बेरोजगारी देशात किती आहे याची आकडेवारी गोळा केली तर सात आठ टक्के बेरोजगारी समोर येते. परंतु देशात एकुण रोजगारांची टक्केवारी काढली तर जवळपास ४५% येते आणि प्रधानमंत्री यांच्या मतानुसार कोणी वर्तमानपत्र, कोणी पकोडे, कोणी चहा, कोणी भाजीपाला, कोणी काही ही विकले तरी ते रोजगाराचा भाग आहे. याचा विचार केला तर ४५% लोक रोजगार आहेत, सात आठ टक्के लोक बेरोजगार आहेत मग मग उरलेले ५०-५०% टक्के जनता नेमकी कोण आहे? जर देशात सात आठ टक्के बेरोजगारी असती तर भारत हा जगातील सर्वात मोठा रोजगार देणारा देश बनला असता. वास्तविक सर्वात मोठा बेरोजगारांचा देश भारत बनला आहे. हा ही विश्वविक्रम आपल्याच नावावर आहे. देशात बेरोजगार जास्त असल्याने जागतिक पातळीवर भारत भिकाऱ्यांच्या संख्येच्या दृष्टीने सुद्धां आघाडीवर आहे. आणि विषेश म्हणजे जगातील सर्वात श्रीमंत भिकारी सुद्धां भारतात आहे. हा जागतिक विक्रम भारताने स्वतः च्या नावावर करून घेतला आहे. इंटरनेट डाटा वापरात जगात एक नंबर असलेल्या भारत हा बलात्कार च्या बाबतीत जागतिक पातळीवर चौथ्या क्रमांकावर आहे. लोकसंख्या चा व बिफ निर्यात करणारा देश हे दोन विश्वविक्रम सोडले तर बलात्काराच्या बाबतीत चौथ्या क्रमांकावर भारत प्रथमच आलेला आहे. बेरोजगारांची संख्या जास्त, आट्यापेक्षा डाटा स्वस्त म्हणून कदाचित बलात्कार च्या बाबतीत देशाने चौथा क्रमांक प्राप्त केला असेल. देशात गोवंश हत्या बंदीवरून व गाईचा संबंध धर्माशी व धर्माच्या पवित्रतेशी जोडणारा देश बिफ निर्यात करणारा जगातील एक नंबरचा देश आहे हा ही अद्भुत विश्व विक्रम भारताने स्वतः च्या नावावर नोंदवून दरवर्षी जवळपास २७००० करोडो रुपयांचा नफा या माध्यमातून मिळवला जातो. देश जीडीपी च्या बाबतीत पहिल्या पाच क्रमांकावर आहे परंतु डरडोई उत्पन्नाचा विचार केला तर भारत पहिल्या शंभर मध्येही नाही. आणि जीडीपी बाबतीत सरकारने एवढे खुशही होऊ नाही कारण. आठ करोड, बारा करोड लोकसंख्या असलेले देश जीडीपी मध्ये आपल्या पुढे आहेत. ज्या देशाची लोकांसंख्या आपल्या देशाच्या लोकसंख्ये पेक्षा चार पाच पट कमी आहे त्या देशाचा अर्थात अमेरीकाचा जिडीपी भारताच्या जवळपास दहापट आहे. भारतात सध्या क्रिकेट ला खुप महत्त्व दिले जाते. क्रिकेट वर हजारो करोडो रुपये खर्च केला जातो परंतु क्रिडा क्षेत्रात इतर खेळांवर दुर्लक्ष केले जाते. ऑलिम्पिक मध्ये अनेक खेळप्रकार खेळले जातात परंतु भारताला सुवर्णपदक कामगिरी लोकसंखे प्रमाणे, खेळाप्रमाणे होत नाही यामागचे कारण समजून घेणे गरजेचे आहे. देशाच्या नावावर केवळ भावनिक बनवून आपल्या अपयशाची समिक्षा होत नसेल तर याला जागृती म्हणत नाहीत. आणि जेथे नागरिक जागृत नसतात तिथे कोणताही विश्वविक्रम होऊ शकतो ज्याचा देशाचे हित, लोकांचे शिक्षण, आरोग्य, वैचारिक पातळी, गरीबी, गरीबांची भुक, हे नाही मिटले तरीही जागृत नसलेले गुलाम नागरिक कोणताही विक्रम करून आपल्या गुलामीचे प्रदर्शन करत असतात. जागृत नागरिक लोकांच्या समस्या सोडवून राष्ट्रहित कसे जपता येईल याचा विचार करत असतात. म्हणून भारताचे अनेक विक्रम असतील तरीही उपासमार, जातीवाद, कुपोषण, भिकारी, अज्ञान, दुर होऊन लोक वैचारिक होणार नाहीत तो पर्यंत वैज्ञानिक पातळीवर विश्व विश्वविक्रम होणार नाहीत. गुलामीच्या माध्यमातून दाखवलेले विक्रम लोकांच्या भुक, आरोग्य, शिक्षण रोजगाराचे प्रश्न सोडवू शकत नसतील तर ते कुचकामी ठरतात.

## बालदिन



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आज १४ नोव्हेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात बालदिन म्हणून साजरा केला जातो. वास्तविक जागतिक पातळीवर २० नोव्हेंबरला बालदिन साजरा केला जातो. १९५४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने ठरवल्यानुसार, पाहिल्यांदाच बालदिन साजरा करण्यात आला. सर्व देशांनी लहान मुलामुलींमध्ये सांप्रदायिक आदान-प्रदान व विविध संप्रदाय वा धर्माबाबतचे सामंजस्य वाढवणे तसेच जगभरातील मुलामुलींचे आयुष्य अधिक चांगले बनवण्याची संकल्पना मान्य करून त्यादृष्टीने काम करावे हा त्या मागचा हेतू. २० नोव्हेंबर हीच तारीख निवडण्याचे कारण असे की १९५९ मध्ये याच तारखेस संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने बाल हक्कांची सनद स्वीकारली.**

शिवाय १९८९ मध्ये याच दिवशी बाल हक्कांच्या मसुद्यावर सह्या झाल्या. हे हक्क आतापर्यंत १९१ देशांनी मान्य केले. भारतात मात्र १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो. कारण भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा हा जन्मदिवस. १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म झाला. पंडित नेहरूंना लहान मुले खूप आवडायची. ते सतत लहान मुलांच्या गराड्यात असायचे. लहानमुले हेच देशाचे भविष्य आहे. आजचा बालक उद्याचा नागरिक आहे. तो नेहमी आनंदी, उत्साही आणि सुरक्षित असायला हवा. देशातील लहान मुले सुरक्षित तर देश सुरक्षित असे ते नेहमी म्हणत. मुलामुलींना सुरक्षित आणि प्रेमाच्या वातावरणात वाढवले गेले पाहिजे तसेच त्यांना आपले आयुष्य फुलवण्याच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासात भर घालण्याच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. पंडित नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान होते. पंडित नेहरूंना बालकांविषयी वाटणाऱ्या प्रेमाची आठवण म्हणून हा दिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो शिवाय पंडित जवाहरलाल नेहरूंना मुलांविषयी वाटणाऱ्या प्रेम व जिव्हाळ्याविषयी आदर व्यक्त करण्याचा देखील हा एक मार्ग आहे. बालकांनाही आनंद घेण्याचा, मौजमस्ती करण्याचा हक्क आहे. आजचे बालक हाच देशाचे भविष्य आहे. या बालकांमधूनच देशाचे भावी सुशिक्षित तसेच मनाने आणि शरीराने आरोग्यसंपन्न असे नागरिक तयार होणार आहेत. हा हक्क मिळालेल्या नशीबवान बालकांनी आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याची जाणीव ठेवली पाहिजे. पालकांनी ही जाणीव आपल्या मुलांमध्ये रुजवली तर भावी नागरिक सुज्ञ आणि समजूतदार बनतील त्यामुळे देशाचे भविष्य उज्ज्वल होईल. बालदिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने मुलांच्या कल्याणासाठी काहीतरी करण्याचा संकल्प केला पाहिजे. देशातील सर्व मुलामुलींना बालदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# दिवाळीत रेल्वेच्या ५०० विशेष गाड्या

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** दिवाळीसह इतर सणांनिमित्त मध्य रेल्वेकडून ५०० विशेष गाड्या सोडण्यात येत आहेत. सणासुदीच्या काळात प्रवाशांची होणारी गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने हे नियोजन केले आहे. सणासुदीच्या काळात रेल्वेला प्रवाशांची प्रचंड गर्दी असते. ही गर्दी कमी करण्यासाठी आणि प्रवाशांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेकडून ५०० विशेष गाड्या सोडण्यात येत आहेत. यामुळे नेहमीच्या गाड्यांव्यतिरिक्त अंदाजे २६ लाख अतिरिक्त प्रवाशांची सोय होणार आहे.

WITH BEST COMPLIMENTS FROM
ap
ajanta
pharma limited
AJANTA HOUSE, CHARKOP, KANDIVLI (W), MUMBAI 400 067.
TEL. 91-22-66061000 FAX: 66061200/300
WEBSITE: WWW.AJANTAPHARMA.COM

दीपावलीनिमित्त सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा!

मनिष रामिल्ला
जिलाध्यक्ष भाजपा तेलुगू आघाडी चंद्रपुर (ग्रा)

प्रो.प्रा.प्रशांत मारोतराव नागुलवाड (गणिपूरकर) 9823250102
(OPHTHALMIC TECH.)
डॉ. रामचंद्र हेंडगे (गऊळकर)
M.B.B.S., M.S., DNB, MNAMS (OPHTHAL)
तज्ञ डॉक्टरांची भेट पहिला व तिसरा रविवार
शिव ऑप्टीकल

कॉम्प्युटरद्वारे डोळे तपासणी व कॉन्टॅक्ट लेन्स क्लिनीक
डॉ. यलसटवार हॉस्पीटलच्या बाजूला मुगळीकर कॉम्प्लेक्स, बस स्टँड जवळ, उमरी ता. उमरी, जि. नांदेड.
शिव ऑप्टीकलमध्ये सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील

दीपावलीनिमित्त सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा!

संजय कुकरेजा
बल्लारपूर, उद्योजक


गोकुल दूध भांडार & बेकरी
यांच्याकडून सर्व ग्राहकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
दिनेश हेमके, बालाजी हेमके, ता. उमरी

दीपावलीनिमित्त सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा!

ज्योती गहलोत
शिवसेना शहर अध्यक्ष बल्लारपूर
उद्धव ठाकरे गट

महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

अर्जंट पाहिजेत
बँक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वत:ची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958

CAFE ROCKSTARZ EAT. CHILL. REPEAT
11:11 ELEVEN ELEVEN
Where Dishes come true..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928










# विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांना धमक्यांचे फोन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र आणि ओबीसीतून आरक्षण देण्याच्या जरांगे पाटील यांच्या मागणीला विरोध केल्याने विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी धमक्यांचे फोन आणि संदेश आले आहेत. त्याबाबत वडेट्टीवार यांनी सोमवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून धमकीचे संदेश आल्यानंतर सुरक्षा वाढवण्याची मागणी केली आहे. दीर्घकाळापासून असलेल्या प्रश्नावर नवीन वाद निर्माण झाला आहे. त्याचा लाभ मराठा युवकांना होणार नाही, अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या कुणबी (ओबीसी) जातीच्या प्रमाणपत्राच्या मागणीवर टीका केली होती. मराठ्यांना 'कुणबी' प्रमाणपत्र देणे हे ओबीसी प्रवर्गातील ३७२ पोटजातींवर अन्यायकारक आहे. पात्रता निश्चित करण्यासाठी मागास आयोगाकडून सखोल सर्वेक्षण करण्याची गरज आहे. मराठ्यांना ओबीसी दर्जा दिल्यास आपले हक्क धोक्यात येऊ शकतात, अशी भिती ओबीसी समाजात आहे.












दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

# ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय, जैतखेडा

ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

हीराबाई दिनकर कोलते
सरपंच जैतखेडा, ता. कन्नड

श्रीमती पूजा मुकेश वेताळ
उपसरपंच जैतखेडा, ता. कन्नड

श्री.ए.डी. चव्हाण
ग्रामसेवक, जैतखेडा, ता. कन्नड

ग्रामपंचायत जैतखेडा येथील सदस्य व कर्मचारी
भगवान डेडवाल, कडूबाई खिल्लारे, कल्पना पवार, रंजना वेताळ, हर्षवर्धन खिल्लारे, दत्तू बोडखे (ग्रा. रोजगार सेवक) कलीम शहा (संगणक चालक) कैलास बडे (शिपाई)

झाडे लावा, झाडे जगवा

परिसरातील नागरिकांनी घरपट्टी, नळी पट्टी भरून ग्रामपंचायत कार्यालयास सहकार्य करावे...



दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा

# नारायणा इंटरनॅशनल स्कुल अँण्ड ज्युनिअर कॉलेज

साई गोल्डन सिटी, लोहा, ता. लोहा, जि. नांदेड. मो. 9637466477, 7378972275

Narayana Pattern

- इयत्ता 6 वी पासूनच NEET आणि JEE ची विशेष तयारी तेही शाळेमध्येच करून घेण्याचा हा नवीन कन्सेप्ट राबवणारी पहिली शाळा म्हणजेच नारायणा इंटरनॅशनल स्कुल.
- इयत्ता 1 ली ते 4 थी च्या विद्यार्थ्यांसाठी IMO, NSO, IEO, BDS, SHREYA INTELLIGENCE यांसारख्या सर्व स्पर्धा परीक्षेची तयारी आता शाळेमध्येच.
- इयत्ता 6 वी साठी Jr. Scientist परीक्षा.
- इयत्ता 9 वी साठी NTSE परीक्षेची विशेष तयारी.

NARAYANA FOUNDATION 6th 7th 8th 9th 10th

नारायणा फाऊंडेशन
साई गोल्डन सिटी, लोहा, ता. लोहा, जि. नांदेड.
मो. 9637466477, 7378972275

प्लेग्रुप, नर्सरी ते इयत्ता १२ वीच्या सर्व शाखांकरीता

## प्रवेश प्रक्रिया सुरु आहे



दीपावलीच्या सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा!

# लक्ष्मी नारायण लॉन्स अँड मंगल कार्यालय

आपले स्वागत करीत आहेत...
परिसरातील नागरिकांनी एकवेळ अवश्य भेट द्यावी!

गजानन नारायण घुगे
शासकिय ठेकेदार
रा. साखरवेल, ता. कन्नड,
मो. 9421899909

राजेंद्र नारायण घुगे
रा. साखरवेल, ता. कन्नड,
मो. 9604391999

पत्ता
कन्नड-पिशोर हायवे, साखरवेल, ता. कन्नड

अदिती अर्थमूव्हर्स & बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स

लक्ष्मी नारायण लॉन्स

कन्नड तालुक्यातील नागरिकांसाठी आम्ही घेऊन आलो आहोत.
यावर्षी प्रथमच लक्ष्मी नारायण लॉन्स पूर्ण सुविधांसोबत.

एकवेळ आवश्य भेट द्यावी, ही नम्र विनंती....



ग्रामसंसद कार्यालय नादरपूर
ता.कन्नड जि.औरंगाबाद

सुंदर माझे गाव सहकार्य जपावे

झाडे लावा झाडे जगवा

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

# ग्रामपंचायत कार्यालय, नादरपूर, ता. कन्नड

श्रीमती सविता दिलीप निकम
सरपंच

सागर रामदास निकम
उपसरपंच

एन.आर. बनकर
ग्रामसेवक


कन्नड तालुक्यात विकासकामांबाबत अव्वल असणारी नादरपूर, ग्रामपंचायत

## सन्माननीय सदस्य वर्ग, नादरपूर

किसन निकम, कृष्णा काथार, नारायण चौतमहाल, नागूबाई चौतमहाल, कांचन निकम, कांचन शांताराम निकम, ज्योती निकम, लक्ष्मण बळी (लिपिक) संजय सोनवणे (पाणी पुरवठा), कृष्णा मोरे (संगणक चालक) बापू निकम (सफाई कामगार), पोपट निकम (रोजगार सेवक)

सन्माननीय ग्रामपंचायत पदाधिकारी व गाव समर्थक ज्येष्ठ व युवा पदाधिकारी हितचिंतक, मित्रपरिवार, नादरपूर, ता. कन्नड

सुरूवातीलाच विकास कामाचा धडाका सुरू, भव्यदिव्य निजामकालीन वेसची रंगरंगोटी करून पूणर्जीवित, अंजना नदीवरील पूलाचे काम पूर्ण, स्मशानभूमीचे काम पूर्ण, गावात येणाऱ्या पाहुण्यांसाठी स्वच्छतागृह उपलब्ध, डागडुजीच्या प्रतीक्षेत असलेली ग्रामपंचायत चकाचक, गावातील वयोवृद्धांसाठी शांतीगृह (पुस्तक वाचनालय) उपलब्ध




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


## दीपावली : आनंद आणि प्रकाशपर्व



आधुनिक केसरी

अन्यथा गाय म्हणजे फक्त एक उपयुक्त पशु आहे, त्यात विशेष काय ? जसा तुम्ही आम्हाला जन्म दिला त्यात विशेष काय असेही कुठूनतरी ऐकायला येते. कृतज्ञता, प्रेम हरवत चालले आहे.

यानंतरचा दिवस म्हणजे धनत्रयोदशी. आधी गायीबद्दल कृतज्ञता. गोवंश हेच पूर्वी धन मानले जायचे. म्हणून त्या धनाची पूजा. शिवाय कुबेर ही धनाची देवता आहे म्हणून या दिवशी कुबेर पूजन. धनाचा उपभोग घ्यायचा तर आरोग्यही उत्तम हवे. आरोग्याची देवता असणारे धन्वंतरी यांची ही जयंती. त्यांचेही पूजन या दिवशी आपण करतो. उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना करतो. डॉक्टर मंडळीसुद्धा आपल्याला रुग्णावर उपचार करताना यश मिळावे म्हणून धन्वंतरी पूजन करतात. आपणही आजच्या या काळात डॉक्टरांना धन्वतरींचे रूप मानून शुभेच्छा देतो. ' आरोग्यम धनसंपदा ' आपले आरोग्य हेच खरे धन आहे हे आपल्याला हा दिवस सुचवतो. म्हणून आपले आरोग्य सर्वांनी जपले पाहिजे. आरोग्य केवळ औषधे घेऊन वा दवाखान्यात जाऊन मिळत नाही. त्याची काळजी आहार, विहार आणि विचार उत्तम राखून आपल्यालाच घेतली पाहिजे हे हा दिवस सांगतो. त्यासाठीच या दिवसात अभ्यंगस्नान इ. चे महत्व आहे. नरकचतुर्दशीच्या दिवशी भगवान श्रीकृष्णाने अत्याचारी अशा भौमासुर किंवा नरकासुराचा वध केला. त्याच्या बंदिवासात असलेल्या स्त्रियांना मुक्त केले. अशा स्त्रियांना समाज स्वीकारणार नाही म्हणून त्यांच्याशी विधिवत विवाह केला. त्यांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. समाजापुढे एक वेगळा आदर्श ठेवला. स्त्रीशक्तीचा सन्मान केला. नरकासुर वधाचा आनंद आणि श्रीकृष्णाच्या या थोर कृतीचा गौरव यांचे प्रतीक म्हणजे हा दिवस. आपल्यातील वाईट विचारांचा नाश करून सद्विचारांचे, सत्कृत्यांचे दीप लावावेत. स्त्रियांचा सन्मान करावा असेच हा दिवस जणू आपल्याला सांगत नाही का ?



## आनंदी पहाट

## आयुष्याच्या प्रवासातील अनुभव हे आपले शिक्षक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

खऱ्याखुऱ्या प्रवासाची सुरुवात आपण अजाणतेपणीच जाणते होऊ लागतो तेव्हा होते. मुळातच हा प्रवास
अनावधानाने सुरु केलेला असतो. प्रवासाचं माध्यम, त्या प्रवासांत कापावं लागणारं अंतर आणि गंतव्यस्थळाच्या
बाबतीत देखील आपण अनभिज्ञ असतो. प्रवासाची सुरुवात वडिलधाऱ्या कौटुंबिक सदस्याचे बोट धरून होत असते. खरं तर ते बोट धरून आपल्याला चालवण्यात त्या व्यक्तीला खूप आनंद मिळत असतो, परंतू आपल्याला मात्र स्वतःच्याच तोऱ्यात तो प्रवास करायचा असतो. वय असं असतं कि भीती म्हणून कशाचीही नसते. कारण भीती वाटावं असं आपल्या हातून काहीही घडलेलंच नसतं. ह्या प्रवासाची जशी भीती वाट नसते, तशीच कोठेही घाईघाईने जाण्याची जरुरीही नसते. पण धडपड मात्र सुरु असते पुढे कोठेतरी जाण्याची. ह्या प्रवासांत निश्चितपणे माहिती नसतं कि कोठे, कधी, का, कसं, कोणासाठी, कोणाबरोबर केव्हा जायचं आहे ? त्याची जाणीव होण्याचं अर्थात ते वय देखील नसतं, कोणतीही
उणीव त्या वयांत असत नाही. ह्या प्रवासांत अनेकदा आपल्या अतिरेकीपणामुळे दिशा चुकते, दिशाभूल होते आणि प्रवास हा प्रवास न राहता प्रयास ठरू लागतो. जीवनाच्या प्रवासाची सुरुवात झाल्यापासून खरं म्हणजे काही तथ्य असणारी पथ्य पाळली तर निश्चितच प्रवासाचा प्रयास वाटत नाही. ह्या प्रवासांत तो एकदाच करण्याची संधी असल्याची जाणीव सतत ठेवणं जरुरीचं असतं. ह्याबाबतीत महत्वाची बाब म्हणजे जीवनाच्या प्रवासांत परतीचा प्रवास नसतो. एकाच दिशेने केलेल्या ह्या प्रवासाची गती आणि दिशा चुकली तर आयुष्याची दुर्दशा होण्यास वेळ लागत नाही.तोपर्यंत विचार आणि वर्तन यांचे समीकरण जुळत नाही.



आधुनिक केसरी

## लोचनी दाटली | मोगराई ||

मोगऱ्याच्या संगे | मोगराचि झालो ||
आता दारी आलो | ज्ञानाईच्या ||१||
मोगऱ्याचा संग | मनासी जडला ||
मोगरा फुलला | काळजात ||२||
तुकाई सांगते | मोगरा महती ||
मोगरा अद्वैती | गंधाळला ||३||
श्वासात मोगरा | चित्तात मोगरा ||
संचित मोगरा | जन्म झाला ||४||
रूजता मोगरा | लेखणी बोलली ||
लोचनी दाटली | मोगराई ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

पुढें लो लागला खेळाचा ।कळप मेळविला पोरांचा ।
आल्यगेल्या डायाचा ।आनंद शोक वाहे ॥२२॥
मायेबापें सिकविती पोटें ।तयाचें परम दुःख वाटे ।
चट लागली न सुटे ।संगती लेंकुरांची ॥२३॥
लेंकुराअंमध्यें खेळतां ।नाठवे माता पिता ।
तंव तेंथेहि अवचिताअ ।दुःख पावला ॥२४॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

प्रभु व्यापक सर्वत्र हैं, सब घट एक समान ।
सन्त देह में देखिये, दर्शत मुकुर समान
।।२६।।(स्वर्वेद तृतीय मण्डल अष्टम अध्याय) ०३/०८/२६
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
परम प्रभू घटाघटात, सर्व पदार्थांमधे एकसमान सर्वत्र व्यापक आहेत. आरशात चेहरा बघण्याप्रमाणे , संत देहात त्यांचे दर्शन होते.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## समर्थ रामदास

आधुनिक केसरी




या जगात दुर्बल माणसाला काही किंमत नसते. आपण बलशाली झाले पाहिजे. 'समान-शीले-व्यसनेषु सख्यम्' या न्यायाने दोघांत सख्य झाले. समर्थ गुरू हरगोविंद यांच्या बरोबर सुवर्ण मंदिरात आले. तिथे ते दोन महिने राहिले. तेव्हापासून समर्थ शस्त्र बाळगू लागले. त्याला ते गुप्ती म्हणत. बाहेरून दिसायला कुबडी. जप करतांना या कुबडीवर बगल ठेवून चंद्रनाडी आणि सूर्यनाडी यांचे संचालन करता येत असे. कुबडीच्या दांड्याला आटे असत, त्यात छोटी तलवार असे. समर्थांची अशी तलवार असलेली कुबडी आजही सज्जनगडावर पहायला मिळते. भारत प्रवास करीत असतांना ते आपल्या प्रत्येक शिष्याला सामर्थ्यांचा आणि स्वाभिमानाचा संदेश देत. "समर्थांना हिमालयात प्रभू रामचंद्रांकडून धर्मसंस्थापनेसाठी प्रेरणा मिळाली होती. त्यापाठोपाठ गुरू हरगोविंद यांनीही त्यांना सशस्त्र क्रांतीची प्रेरणा दिली. समर्थ सांप्रदायांमधील प्रमूख शिष्यांपैकी वासुदेवशास्त्री हे एक होत. यांचा मठ कण्हेरी येथे आहे. कण्हेरी हे गांव मांढरदेवी डोंगराच्या (म्हणजे काळुबाई देवस्थान ज्यावर आहे) तिथे पायथ्याशी आहे. पुणे सातारा रस्त्यावर खंडाळा पारगांव वरून पश्चिमेस ११ किमी अंतरावर हे गांव आहे. शिरवळ वरूनही इथे बसने जाता येते. पुणे येथून ६९ किमी वर हा मठ येतो. अत्यंत रमणीय स्थानी सुंदर असा हा मठ आहे. इथे वासुदेवशास्त्री व भीमस्वामी यांच्या समाधी आहेत. या मठाची समर्थ रामदास - वासुदेव - माधव(महादेव)- पुरुषोत्तम-भीमस्वामी - जयराम व नारायण - गंगाधर अशी गुरुपरंपरा आहे. - समर्थ रामदास स्वामींना ज्यांनी प्रत्यक्ष पाहीले ते गिरिधरस्वामी. त्यांना समर्थांनी वेणीस्वामी शिष्या बाईयाबाई यांच्याकरवी अनुग्रहीत करून बीड (पुर्वीचे चंपावती) या क्षेत्रात कार्यस्थान करा सांगितले. बिंदुसरा नदीतीरावर रामतिर्थ या स्थानी गिरिधर यांची समाधी आहे. या गिरिधरकृत "समर्थप्रताप" या ग्रंथात समास १०, ११ व १२ मध्ये समर्थां रामदासांच्या भारतवर्षा मधील शिष्यसंप्रदाय व स्थाने याचा तपशील आढळतो. दहाव्या समासामध्ये श्लोक १४ वासुदेवस्वामींचा उल्लेख आहे. "वासुदेव नामा अनुष्ठानी। समर्थप्रतिमा म्हणती जनीं। उत्कट परमार्थ विस्तारुनी। समर्थ चरणी लीन राहे।।१४।।" तसेच "वासुदेव असा पंडीत निष्पृह। तेणे शिष्यगण बहु केले। हजारोंहजार शिष्य केलें। मंत्रा पालटले बुद्धीबळें।।" याशिवाय राजारामप्रसादी कृत ग्रंथात, "भक्तमंजिरीमाला" यामध्ये, "राजश्री हातें हा मठ करविला। कण्हेरीचा मठ प्रतापेची केला" असा उल्लेख आढळतो. श्रीहनुमंतस्वामींची बखर पान क्रमांक १६७ ते १७६ प्रकरण ९ मध्ये तसेच धाराशिव मठाचे श्री अनंतदास रामदासी यांच्या सप्तकांडात्मक "दासायण" यामधील लोकोद्धारकांड पान ३२१ ते ३३३ या ग्रंथांमध्ये वासुदेवशास्त्रींबाबत अधिक माहीती मिळते.

## सगुणभक्ति

आधुनिक केसरी

सर्वांभूती भगवंत आहे याची खात्री पटायच्या आधी, तो माझ्यात आहे हे पटले पाहिजे. सोन्याचा दागिना ' मला सोने भेटवा ' असे म्हणत नाही; त्याचप्रमाणे, मला भगवंत बाहेरून कुठून भेटायचा आहे असे नाही समजू. तो आपल्याजवळच आहे. मनुष्य बोलतो तसा जर वागला तर त्याला त्याची प्रचीती आल्याशिवाय राहणार नाही. मी 'कुणाचा' आहे हे जर जाणले तर मी ' कोण ' हे कळायला वेळ लागायला नको. सत्समागम केला म्हणजे मी कोण आहे हे कळते. साक्षीरूपाने नटलेला जो ' मी ', त्याला पाहायला जंगलात जायला नको. ' माझेपण ' सोडावे म्हणजे ' मी ' चा बोध होतो. भगवंत चोहोकडे भरलेला आहे असे आपण नुसते तोंडाने म्हणतो, पण त्याप्रमाणे वागत नाही हे आपले मूळ चुकते. भगवंत माझ्यात आहे तसाच तो दुसऱ्यातही आहे, हे आपण सोयिस्करपणे विसरून जातो. जसा खोलीतला दिवा प्रकाशाने सर्व खोली व्यापून टाकतो, तसे हे सर्व जग भगवंताने व्यापून टाकले आहे. मी कर्ता नसून



राम कर्ता आहे हे म्हटले म्हणजे त्यात सर्व आले. पोशाख निरनिराळे केले तरी मनुष्य हा एकच असतो. संन्यास हा मनाचा असतो, पोशाखाचा नसतो. मनावर कशाचाच परिणाम होऊ न देणे हाच संन्यास.

सगुणभक्ती करावी, भक्तीने नाम घ्यावे, नामात भगवंत आहे असे जाणावे, आणि भगवंताचे होऊन राहावे, हाच परमार्थाचा सुलभ मार्ग आहे. साधुसंतांनी अतिशय परिश्रम घेऊन आणि स्वतः अनुभव घेऊन हा मार्ग आपल्याला दाखवून दिला आहे. आपले ज्याच्याशी साम्य आहे त्याच्याशी आपली मैत्री जमते. आपण देही असल्यामुळे आज आपला देवही आपल्यासारखाच, पण त्याच्याही पलीकडे असणारा असा पाहिजे. अशा प्रकारचा देव म्हणजे सगुण मूर्ती होय. लहान मुलगा एखाद्या वस्तूसाठी हट्ट करू लागला की, आपण त्याच्यापुढे त्या वस्तूसारख्या इतर, पण बाधक नसणाऱ्या वस्तू टाकतो. त्याचप्रमाणे, सगुणोपासनेचा परिणाम होतो. दृश्य वस्तूंवर आपले प्रेम आहे; जे दिसते तेच सुखाचे आहे असे आपल्याला आज वाटते; म्हणून आपणच आपल्या कल्पनेने भगवंताला सगुण बनविला आणि त्याची उपासना केली. आपली बुद्धी निश्चयात्मक होण्यात या उपासनेचा शेवट होईल. आग्रह आणि प्रेम फक्त एका भगवंताच्या ध्येयाबद्दल असावे. इतर ध्येये असावीत, पण त्यांचा आग्रह नसावा. प्रपंचामध्ये व्यवहार होत असताना भगवंतापासून जेव्हा वृत्ती हलत नाही, तेव्हा तिला ' सहजसमाधी ' असे म्हणतात. सहजपणाने जगणे, म्हणजे सहजपणातून वेगळे न राहणे, हीच सहजसमाधी होय. ' राम सर्व करतो ' आणि ' राम माझा दाता आहे ' ही भावना ज्याची स्थिर झाली, त्याच्यावर भगवंताची कृपा झाली असे समजावे. त्याच्या जन्माचे सार्थक झाले हे सांगणे नकोच.

दीपावली पाडवा व भाऊबीजनिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!



शुभेच्छुक
समाजशास्त्र विभाग मॉडेल कॉलेज



प्रा.भागवत गोरे सर
( समाजशास्त्र विभाग)

प्रा. डॉ.भिमराव पुडंगे सर
(समाजशास्त्र विभाग प्रमुख)




भाजप शहर अध्यक्ष
श्री. सुनिल भाऊ पवार
यांच्यातर्फे दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा
कन्नड, जि. संभाजीनगर

वाशिम जिल्ह्यातील जनतेस
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

ग्राम पंचायत कार्यालय
शेलुखडसे
ता. रिसोड, जि. वाशिम



शुभेच्छुक



सौ. रेणुका भानुदास ताकतोडे
(सरपंच, ग्रा.पं. शेलुखडाले )

श्री नारायण विश्वनाथ खडसे
(उप-सरपंच, ग्रा.पं. शेलुखडले)

श्री. जगन दशरथ खडसे (सदस्य) श्री. आकाश मुरलीधर खडले (सदस्य)
सौ. रुपाली जगदीश खडसे (सदस्य) सौ. आयोध्या गोपाल खडसे (सदस्या)
सौ. राणु सुधाकर खडसे (सदस्य) श्री. विठ्ठल उध्दव पारडे (सदस्य)
सौ. ज्योती संजय तुरेशव (सदस्य) कु. विजयाताई रामराव लांडगे (सचिव)
श्री. नामदेव रामचंद्र खडले (संगनक परिचारक ) श्री. ज्ञानेश्वर दगडू खडसे (मा.पु. शिपाई)
परसराम प्रल्हाद खडसे (ग्रा.पं. शिपाई) श्री. मनिष आसाराम खडसे (रोजगार सेवक )

तथा समस्त गावकरी मंडळी
शेलुखडले ता. रिसोड,
जि. वाशिम

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

गंगासागर गॅस एजन्सी
शिवनगर, चाळीसगाव रोड, कन्नड ( 0235) 220919

- सर्व ग्राहकांना सुचित करण्यात येते की, ऑनलाईन गॅस बुकिंग नंबर 8454955555 या नंबर वरून मिस कॉल करून गॅस बुकिंग करून सिलेंडर घ्यावे.
- नवीन कनेक्शन व डबल सिलेंडर त्वरित व योग्य दरात मिळेल.
- आपल्या सेवेसाठी आम्ही घेऊन आलो नवीन युगातील स्मार्ट किचन साठी स्मार्ट कंपोझिट 10 किलो सिलेंडर.
- जुन्या सिलेंडरपेक्षा निम्मे वजन कमी.
- माता भगिनींना उचलणे अत्यंत सुलभ.



प्रो.पा. श्री. रमाकांत बी. जोगदंड,
श्री. संजय बी. जोगदंड.

व्यवस्थापक
श्री कैलासराव वसंतराव शिंदे
शिवराई, कन्नड. 9922116694

इंडियनऑयल
IndianOil

ग्रामपंचायत बहिरगाव,
ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

सर्व जनतेस
दीपावलीच्या हार्दीक शुभेच्छा





डॉ. श्री. केशव शिरसे
सरपंच

श्री. रवींद्र बनकर
उपसरपंच

श्री. योगेश धाटबळे
ग्रामसेवक

ग्रामपंचायत सदस्य
सौ. रोहिणी चंद्रकांत पवार, सौ. रत्नाबाई भाऊसाहेब पवार,
सौ. वर्षा किशोर नरोडे, सौ. रोहिणी सुखदेव साळुंके,
सौ. सीमा युवराज जाधव श्री. मिलिंद मुरलीधर मोरे,
सौ. कोमल आकाश दापके, श्री. योगेश किसन जाधव

# बलशाली भारताचे दर्शन : मोदी पर्वातील परराष्ट्र धोरण



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारताचे परराष्ट्र धोरण नवनवीन वळणे घेत आहे. नव्या दिशांनी बदलत आहे. पहिल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकार काळात भारतात अटलबिहारी वाजपेयी यांनी या परराष्ट्र धोरणाचा भक्कम पाया घातला व गेल्या ९ वर्षांत पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांनी त्यावर कळस चढविला आहे. गेल्या ७५ वर्षांमध्ये प. जवाहरलाल नेहरू यांच्या काळापासून आजपर्यंत परराष्ट्र धोरणातील यशाचे शिखर कोणते असेल तर ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तेजस्वी गतिमान दशकात होय.**

अंतर्गत सुरक्षा व शांततेस जोडून बाह्य जगातील वातावरण हे देशाच्या विकासाला अनुकुल ठेवण्यात आले. तेवढे यापूर्वी कधीही झाले नाही.

भारत प्रथम हे सूत्र घेवून भारताच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा हा मौलिक कार्यकाळ ठरला.

शेजारी प्रथम हे सूत्र घेवून 'सब का साथ, सबका विकास, सबका विश्वास' या धोरणाला अनुवू*ल केल्यामुळे त्यांच्या रचनात्मक प्रयत्नाला अधिक यश आले. त्यामुळ हा कालखंड आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये भारताचा एक विलक्षण ठसा उमटविणारा ठरला.

**विलक्षण ठोस योगदान :** स्वहिताचा पुरस्कार करणारे राष्ट्रहित जपणारे परराष्ट्र धोरण १९१४ नंतर प्रथमच प्रकाशात आले. प्रथमच परराष्ट्र धोरणाचे विलक्षण ठोस, सुस्पष्ट, सुसंगत व दमदार धोरणाचा प्रयत्न झाला. जम्मू काश्मीरला स्वायत्त दर्जा देणारे ३७० कलम रद्द करण्याचा निर्णय असो विं*वा वॅ*नडामधील भारतविरोधी दहशतवादी कारवायांना प्रतिशह देण्याचे धोरण असो, आपल्या परराष्ट्र धोरणामधील देशहिताची तेजस्वी कमान प्रथमच प्रकट झाल्याचे दिसून आले. पं. दीनदयाल उपाध्याय त्यांचा ''राष्ट्रचिंतन'' या ग्रंथामध्ये भारताचे परराष्ट्र धोरण कसे असावे याबाबत जे दिग्दर्शन केले होते, त्या असर सत्याचा पुनःप्रत्यय या अमृतकाळात प्रकर्षाने दिसून आला व दिसून येत राहील, यात शंका नाही.

भारत हे अणुशक्तीधारक राष्ट्र असावे.

प्रगत तंत्रज्ञानाच्या आधारे संरक्षणदृष्टीने देश स्वयंपूर्ण आणि आत्मनिर्भर असावे.

कसोटीच्या प्रसंगी स्वहितावर लक्ष केंद्रीत करून निर्णय घेण्याची क्षमता असावी.

एक स्थित धुरव या नात्याने केंद्रस्थानी प्रबळ सत्ता असल्यामुळे भारताचे परराष्ट्र धोरण उपरोक्त तीन सुत्रांवर भर देवून अधिक प्रभावशाली आणि तेवढेच आक्रमक रूप धारण करू शकेल असे आहे.

पं. जवाहरलाल नेहरू यांच्या काळातील अलिप्तता चळवळ ही आरंभीच्या काळामध्ये विकासाला पोषक ठरली. पण पुढे चिनी आक्रमणानंतर भारताच्या पंचशील धोरणाचे आणि निष्क्रीय अलिप्ततावादी धोरणाचे पितळ उघडे पडले.

पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या परराष्ट्र धोरणामधील राष्ट्रीय अलीप्ततेचा प्रत्यय हमास, इस्त्रायल संघर्षाच्या प्रसंगी आला. इस्त्रायलवर झालेल्या आकस्मात दहशतवादी हल्ल्याचा निषेध करून भारत इस्त्रायलची बाजू घेऊ शकला तसेच पॅलेस्टाईनला मानवतावादीदृष्टीने मदतही करू शकला. रशिया, युव्रे*न युद्धामध्ये तटस्थ राहून भारताने उभयतांना शांत करण्याचा प्रयत्न केला. चर्चा, सुसंवाद विं*वा डायलॉग याच तोडगा असू शकतो, या मुद्यावर भर दिला आहे. इजिप्तमधील भुवं*पानंतर जगात प्रथम मदतीला धावून गेला तो भारतच. अफगाण देशातील अन्नान दशा पाहून कोट्यवधी टन गहू अफगाण बांधवांना मोफत देऊ शकला तो केवळ भारतच. सोन्याची श्रीलंकाही उजाड व ओसाड झाली. तेव्हा सिंहली बांधवांच्या मदतीला प्रथम धावून गेला तोही भारतच. शेजारी मित्र राष्ट्रांना मदतीचा हात दिला आहे तो भारताच्या उदार व सहिष्णू परराष्ट्र धोरणामुळे होय.

दुर्दम्य व अजिंक्य स्वातंत्र्यानंतर प्रथमच परराष्ट्र धोरण हे आता मिळमिळीत नाही तर ठोस आक्रमण व जोरकस बनले आहे. दुर्दम्य असा आशावाद आणि अंगिकार अजिंक्य आत्मविश्वास यांचा सुरेख संगम आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये नरेंद्रभाई मोदी यांनी साधला आहे. कठीण प्रसंगी स्वतः निर्णय घेतो व ठामपणे उभा राहतो हे आक्रमक चीनला भारताने ठणकावून सांगितले आहे. स्वतंत्र व स्वयंभू परराष्ट्र धोरण धमकावण्याच्या आधीर राष्ट्र राहू शकत नाही ते निर्भय आणि तेवढेच निर्णायक आहे हे अरूणाचलाविरूद्ध चीनला ठणकावून सांगितले आहे. अरूणाचल हा भारताचा अविभाज्य भाग आहे व तो राहील.

**कोव्हीड काळातील भूमिका :** कोव्हीड-१९ जागतिक महामारीच्या काळामध्ये भारताने जगाला हे दाखवून दिले. महासत्ता म्हणवून घेणारे चीन व अमेरिका हे स्वार्थी व आत्मकेंद्री आहेत, जगात खरी उदार अंतकरणाने कोणी मदत केली असेल तर ती भारताने. जगातील १६० देशांना मोफत लस पुरविली व गरीब १२३ देशांना मोफत औषधांचा पुरवठा केला. एवढी उदारता त्यावेळी महासत्ता चीन व अमेरिका यांनीही दाखविली नाही. त्यामुळे भारताचे हे मानवतावादी कार्य परराष्ट्र धोरणाचा एक भाग आहे.

**बहुध्रुवी जगात भारत :** जागतिकीकरणानंतर जगात अमेरिका व चीनला आपली एकवें*द्री सत्ता स्थापन करावी अशी महत्वाकांक्षा होती, पण ती धुळीस मिळाली. हे एकध्रुवी मॉडेल कुचकामी आहे, हे जगाने सिद्ध केले. एकसत्तावें*द्री मॉडेलचे धोके हे जगासमोर आले आणि त्याच पर्वकाळामध्ये बहुध्रुवी जगामध्ये एक प्रभावी सत्ता म्हणून भारताचा उदय झाला. भारताने केलेली जगाची सेवा त्यामुळे विश्वासार्ह ठरली.

युव्रे*न युद्धानंतर युरोप व आप्रि*केतील अनेक देशांवर उपासमारीची वेळ आली तेव्हा विश्वासार्ह व लवचिक अशी अन्न पुरवठा सारखी मदत तयार करण्याचे आव्हान होते ते केवळ भारताने स्वीकारले हेही लक्षात घेतले पाहिजे. भारताचा विचार हा सर्वसमावेशक विकासावर आधारलेला आहे व सर्वांना गुंतवून ठेवणारा तसेच कल्याणाकारी असा आहे.

**वसुधैव कुटुंबम :** उपनिषदातील, हे विश्व कुटुंब आहे व श्लोक (महाउपपनिशद ६-७२) भारताने जी-२० परिषदेने घोषवाक्य बनविले होते. जागतिक कल्याण विकास आणि सुरक्षिततेसाठी भारताचा विचार हा जगाला तारणारा आहे. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्या हस्ते भारतीय परराष्ट्र धोरणाचा विचार हा अधिक दूरदृष्टीचा, सुस्पष्ट आणि तेवढाच लोकाभिमुख व वैचारिक तसेच कार्यात्मक स्पष्टता दर्शविणारा आहे. परराष्ट्र मंत्री. एस. जयशंकर यांनी संयुक्त राष्ट्रसंघामध्ये केलेले भाषण हे भारतीय परराष्ट्र धोरणाचा पाया स्पष्ट करणारे आहे. त्यांनी दहशतवादाच्या विरोधात कोणतीही सोयीची तात्पुरती भूमिका घेता येणार नाही. तो कोणत्याही परिस्थितीत निषेधार्ह आहे. कॅनडाच्या दुटप्पी धोरणावर त्यांनी टीकास्त्र डागले आहे.



**मोदी सिद्धांत :** भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये राष्ट्रहिताचा प्रखरतेने व स्पष्टपणे विचार करणारा मोदी सिद्धांत हा निर्णायक ठरला आहे. त्यांनी असे सूत्र घेतले की आमच्या प्रादेशिक एकात्मता व अखंडतेचा आदर इतरांनी करावा आम्हीही तसे करतो पण आमच्या भूमीकडे कोणी वाकड्या नजरेने पाहिलेले आम्ही सहन करणार नाही. शेजारी प्रथम, ॲक्ट ईव्ह ही सर्व धोरणे याच सूत्रांवर आधारलेली होती व आहेत. भारत अमेरिका शिखर परिषदेत व दिल्लीतील जी-२० परिषद, जी-७, भारत, रशिया एम.सी.ओ. बैठक, ब्रिक्स आशियान प्लस, १२०२ अमेरिका, जपान टू प्लस टू या सर्व शिखर बैठकांतील भारताचा सहभाग हा कलाटणी देणारा व निर्णाय ठरला आहे.

अलीकडच्या काळात भारताचे परराष्ट्र धोरण हे अधिक विस्तारित व सर्वसमावेशक बनत आहे. पूर्वेकडे पाहता या धोरणाचा विस्तार सार्वजनिक एशियान संघटनांच्या कामातून दिसत आहे. शेजारी मैत्रीपूर्ण संबध असलेल्या राष्ट्रांशी मुक्त व्यापार करार केले जात आहेत. आखाती देशांमध्ये गुंतवणूक वाढविली जात आहे. त्यामुळे आत्मनिर्भर व व्यापारही वाढत आहे. सागरी सुरक्षेच्यादृष्टीने हिंद प्रशांत क्षेत्रातील राष्ट्रांशी मैत्री प्रस्थापित केली जात आहे. आग्नेय आशियातील राष्ट्रांशी असलेले आर्थिक व सांस्कृतिक संबंध अधिक बळकट होत आहेत.

**संयुक्त राष्ट्रसंघात सुधारणा :** भारताने त्यांच्या स्थापनेपासून संयुक्त राष्ट्रसंघाला शांतता, सुरक्षा व विकासाचे साधन मानले आहे. भारत सध्या सदस्य म्हणून कार्यरत आहे. परंतु भारताचे वाढते कर्तृत्व व प्रभुत्व लक्षात घेता भारताला संयुक्त राष्ट्रसंघामध्ये कायमस्वरूपी सदस्यत्व मिळावे ही जुनी मागणी पुन्हा जोर धरत आहे. जागतिक परिषदेतील भारताची प्रभावशाली भूमिका लक्षात घेता भारताला सुरक्षा परिषदेमध्येही कायमस्वरूपी सदस्यत्व मिळाले पाहिजे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या रचना व कार्यपद्धतीमध्ये अमूलाग्र सुधारणा करणे आवश्यक आहे.

महासत्तांच्या हितसंबंधामुळे जगात शांतता व स्थैर्यता धोका पोहोचवत आहेत. विकसनशील व दक्षिणेकडील राष्ट्रांच्या सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक विकासावर अधिक लक्ष देण्याची गरज आहे.

चुतुर्भुज सुरक्षा संघटना असो की क्वाड ब्रिक्स असो भारत अशा अनेक संघटनांमध्ये सक्रीय राहून त्यांचा मानवी विकासासाठी कसा उपयोग होईल यावर सदैव भर देत आहे. नवीन जागतिक व्यापार व्यवस्था, बौद्धिक संपदा हक्क, कृत्रिम बुद्धीमत्तेचे संभाव्य परिणाम, हवामान बदलानंतरचे प्रश्न, दहशतवादाची बिकट समस्या, अनेक प्रश्नांवर जागतिक सहमतीवर भारताचा भर आहे. एकाचवेळी दहशतवाद व चर्चा शक्य नाही अशी भूमिका घेऊन भारताने पाकला टोकले आहे. राज्य पुरस्कृत अशा दहशतवादाचा भारताने जगाच्या सर्व व्यासपीठावर निषेध केला आहे.

**उद्दिष्टे व फलश्रुती :** भारताचे पारंपारिक व आपरंपरिक शत्रू व धोरणापासून संरक्षण करणे.

भारताच्या सर्वांगीण पोषक असे बाह्य वातावरण तयार करणे, त्यामुळे जेणेकरून विकासाची फळे शेवटच्या गरीब माणसांपर्यंत पोहोचू शकतील.

जागतिक व्यासपीठावर भारताचा आवाज बुलंदपणे प्रकट करणे आणि जागतिकीकरणाच्या परिणामांच्या मुद्यावर जागतिक मतावर प्रभाव टावू शकेल अशा मुद्यांचा विकास करणे.

विदेशात राहणाNया भारतीयांना गुंतवून ठेवणे. त्यांच्या हिताचे रक्षण करणे आणि आत्मविश्वासाने भरलेल्या जगामध्ये भारताचा आवाज बुलंद होत आहे. तो देशांतर्गत वास्तव आणि सभ्यतेमध्ये रूजलेला आहे. तसेच हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी दृढ आहे. या सर्व उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी भारताचे परराष्ट्र धोरण हे दहशतवादी विरोधासाठी कार्यरत आहे.

**समारोप :** पं. जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी युगातील साचेबद्ध चौकटीतील अलिप्ततावादी परराष्ट्र धोरण बदलून आता हे धोरण अधिक तेजस्वी व बुलंद बनले आहे. चीन वा पाकिस्तान आता भारताकडे वाकडी नजर करून पाहणार नाही एवढी सुरक्षा भारताने केली आहे. शिवाय एक समर्थ आणि शक्तीशाली नेता म्हणून नरेंद्रभाई मोदी यांनी जगात पहिले स्थान प्रस्थापित केले आहे. जगातील 'टाईम' मसिकासारख्या अनेक संस्थांनी केलेल्या पाहणीमध्ये त्यांचे स्थान सर्वश्रेष्ठ ठरले आहे. जगातील ६० पेक्षा अधिक देशांना त्यांनी प्रत्यक्ष भेटी दिल्या. शिवाय अनेक सभातील शिखर परिषदातून त्यांनी भारताचे प्रभावी नेर्तृत्व केले आहे. त्यांच्या गतिमान व चैतन्यदायी नेतृत्वाचा ठसा हा जगाच्या कानाकोपऱ्यामध्ये उमटला आहे. त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे पूर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिण सर्वत्र भारताची महती व प्रगती याचा सुगंध पसरला आहे. या बदलाला परराष्ट्र धोरणाची तेजस्वीता स्पू*र्तीप्रद व प्रेरक ठरली आहे.

दिवाळी स्पेशल
दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!



दिवाळी ऑफर ५०० रु. पुढील खरेदीवर एक शाही स्नान पॅक फ्री.
सुधीर कोर्टीकर
मोतीचूर लाडू | खमंग चकली | लज्जतदार करंजी | खुसखुशीत अनारसे | झकास शंकरपाळे | आम्रखंड | श्रीखंड | मलई चक्का
६६ वर्षांची निर्भेळ परंपरा असलेले मराठवाड्यातील एकमेव ठिकाण
प्रत्येक सणाचे खास विशिष्ट खाद्यपदार्थ मिळण्याचे एकमेव ठिकाण
भावे आणि कंपनी
कुंभारवाडा 9850019109 | एन-५ सिडको 9325212390 | उल्कानगरी 9763685381 | पीरबाजार 8805286395
स्टेशन रोड, हॉटेल विट्सससमोर :- 7276358516

# फटाके विक्रेत्यामुळे नागरिकांचा जीव धोक्यात

## पालिका कर्मचाऱ्यांच्या संगनमताने प्लास्टिक पिशव्यांचा सरास वापर

आधुनिक केसरी न्यूज


**धुळे :** शेकडो नागरिकांच्या जीवावर बेतून कुठलीही सुरक्षा नसताना सरासर फटाके विक्री व प्लास्टिक पिशव्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर व शासनाची फसवणूक करून ग्राहकांना कुठलेही बिल न देता मोठ्या प्रमाणावर फटाके विक्री करत असताना बोहरी समाजाचे व्यापारी पुराव्यासहित आढळून आले आहे फटाके व्यवसायिकावर मानवी जीवित हानी कायदा अंतर्गत मोठी कारवाई व्हावी अशी पत्रकार संघाची मागणी आहे.

गेल्या कित्येक दिवसापासून धुळे जिल्ह्यात दिवाळीच्या नावावर फटाक्यांचा जीव घेणा काळाबाजार सुरू आहे शहरातील फुलवाला चौक येथील नामांकित फटाके विक्रेता शहरी हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणावर फटाक्यांचा साठा ठेवून विक्री करतोय तरीही त्यांच्यावर कुठलीही कारवाई करण्यात आली



नाही. गेल्या कित्येक वर्षापासून हा स्थानिक ठिकाणी व्यवसाय करत आहे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते तरीही नागरिकांसाठी कुठलीही सुरक्षा नाही. त्यानंतर असाच प्रकार नगाव बारी परिसरात पाहायला मिळाला त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर फटाक्याचा साठा दिसून आला त्या ठिकाणी शेकडो नागरिकांनी फटाके घेण्यासाठी गर्दी केली होती त्या ठिकाणी देखील नागरिकांना कुठलीही सुरक्षा नव्हती अग्निशमन कुठेही दिसून आले नाही. प्लास्टिक पिशव्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असताना दिसून आला. पालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्या ठिकाणी प्लास्टिक पिशव्यांच्या कारवाईच्या नावावर मोठ्या प्रमाणावर रक्कम व फटाके घेऊन तेथील विषय दाबण्याचा प्रयत्न केला आहे. काही पोलिसांचा देखील त्यात समावेश आहे असा आरोप नागरिकांनी देखील केला आहे. त्या ठिकाणी कुठलीही घटना घडली असती तर शेकडो नागरिकांचा जीव गेला असता त्या ठिकाणी असंख्य मोठे वाहनही होते अशा या फटाके व्यावसायिकावर मानवी जीवितहानी कायद्यानुसार मोठी कारवाई होणे गरजेचे आहे.


वाशिम जिल्ह्यातील सर्व जनतेस
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
सुनील पाटील खडसे
माँ रेणुका मेडिकल
वाशिम
गजानन पाटील खडसे
वेणुसन्स लाइफ सायन्सेस
वाशिम


रिसोड तालुक्यातील सर्व जनतेस
दीपावलीच्या मन:पूर्वक शुभेच्छा
शुभेच्छुक
पुरवठा विभाग
तहसील कार्यालय, रिसोड, जि. वाशिम


दिपावली
निमित्त तुम्हाला व तुमच्या कुटुंबियांना
हार्दिक शुभेच्छा !!
साहेबराव पाटोळे
प्रदेशाध्यक्ष साहित्यरत्न
अण्णाभाऊ साठे सोशल फोरम महाराष्ट्र
सौ पुनमताई मनीष पाटोळे
नगराध्यक्ष न.प. लोणार
बादशाह खान
उपनगराध्यक्ष न.प.लोणार


दीपावलीच्या
हार्दिक
शुभेच्छा
शुभेच्छुक
रोहिदास चव्हाण
माजी आमदार तथा लातूर जिल्हा
संपर्कप्रमुख शिवसेना


दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
ग्रामपंचायत कार्यालय,
देवगिरी, दौलताबाद
ता. जि. छत्रपती संभाजीनगर
श्री.पी.ए. तुपे
ग्रामविकास अधिकारी
मो. 9422915823
शेख जाविद सत्तार
उपसरपंच
मो. 9910444888
श्रीमती शबाना रहीम शेख
सरपंच
मो. 9970379726/7773938307
सन्माननीय ग्रामपंचायत सदस्य
श्री. जाधव सतीश नानासाहेब
श्रीमती देशमुख कांताबाई अशोक
श्रीमती तुपे कुसूम बाळ
श्रीमती साळवे अश्विनी किरण
श्रीमती पेरकर अश्विनी राधाकिसन
श्री. पाडळे योगेश गणेश
श्रीमती झळके रंजना शिवाजी
श्रीमती आढाव सुनिताबाई आसाराम
श्री. जाधव किशोर सोमीनाथ
श्री. सय्यद मतीन मुजीब
श्रीमती शेख नुरजान मजीद
श्री. घुसळे दीपक हनुमंत
श्री. सय्यद इरफान एसदान
श्रीमती रोकडे बबाबाई रामकिसन


दीपावलीच्या
सर्व जनतेस
हार्दिक
शुभेच्छा
शुभेच्छुक
डॉ. अभय का. पाटील
सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी
डॉ. के. एस. पाटील
मल्टीपर्पज फाऊंडेशन, अकोला

# दिवाळी सण मोठा! नाही आंनदाला तोटा!



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**दिवाळी सण मोठा! नाही आनंदाला तोटा, असे म्हटले जाते. बरेच जण वैयक्तीक, कौटुबिंक तर सामाजिक कार्य करुन हा सण करतात.यात त्यांना आनंद मिळतो! काळ बदलत चालला आहे, तसे सणाचे स्वरूप बदलत चालले आहे. पूर्वी आकाश कंदीलात तेलाचा दिवा लावला जाई आता त्यात वीजेचे दिवा लावला जात आहेत! तेंव्हा नाते व मित्र मंडळी एकमेकाच्या घरी जाऊन शुभेच्छा असत! आता तर सोशल मिडीयावर शुभेच्छा वर्षाव होत आहे. आपण मोबाईलमुळे नातेवाईकांचा थेट संवाद कमी चालला असून दूरावा निर्माण होत आहे.हे सोशल मिडियाचा वापर मित्रापेक्षा शत्रू अधिक निर्माण करत आहोत!**

दिवाळी अथवा दीपवाली हा प्रामुख्याने हिंदू तसेच दक्षिण आशिया व आग्नेय आशियातील अन्य धर्मीय समाजात कांही प्रमाणात साजरा केला जाणारा उत्सव आहे. माहितीनुसार दिवाळी हा सण किमान तीन हजार वर्षे जुना आहे.पण त्यावेळेसचे स्वरूप आजच्या पेक्षा भिन्न होते. प्राचीन काळी हा यक्षांचा उत्सव मानला जायचा. दीपावलीचे मुळचे नाव यक्षरात्री असे होते,ते हेमचंद्राने नोंदवलेले आहे.वात्स्यायनाच्या कामसूत्रा तही तेच नोंदवलेले आहे.नीलमत पुराणातही या सणाला दीपमाला असे म्हंटले आहे.कनोजचा राजा हर्षवर्धन यांनी" नागानंद' नाटकात या सणाला 'दीपप्रतिदूत्सव'असे नाव दिलेले आहे. दिवाळी सण अंधाराला चिरून प्रकाशाचे अस्तित्व निर्माण करणारा व दीप मांगल्याचे प्रतिक मानला जातो. त्या प्रकाशाने आपल्या जीवनतला अंधकार दूर व्हावा म्हणून दीपोत्सव साजरा केला जातो.निसर्गाने पावसाळ्यात भरभरून दिलेला आनंद उत्सव आनंदाचा,कृतज्ञतेचा हा सोहळा असतो.या दिवशी गृहिणी सायंकाळी दारात सुदर व आकर्षक रांगोळ्या काढतात व दिवे लावतात. घराच्या दारात आकाश दिवा लावला जातो.महाराष्ट्रात कांही ठिकाणी मुले या उत्सवात मातीचा किल्ले तयार करतात.त्यावर मातीची खेळणी मांडतात,धान्य पेरतात.यामागची परंपरा कशी व केंव्हा सुरू झाली याची नोंद नाही. पण मुलांच्या हौसेचा भाग म्हणून याकडे पाहिले जाते.हिंदू मधील दिवाळी सणाला पौराणिक कथांचा आधार आहे. तसेच जैन पुराणात देखील याचा उल्लेख आहे. इसवी सन पूर्व ५९९ यासाली २४ वे जैन तीर्थकर वर्धमान महावीर यांचे आश्विन महिन्यातील अमावश्याच्या पहाटे चार वाजता बिहार राज्यातील पावापूरी येथे निर्वाण झाले. म्हणजे मोक्ष मिळाला.त्यांनी मोक्ष मिळवला त्यापित्यर्थ पहाटेच्या अंधारात असंख्य दिवे उजळून दीपवाली साजरी करण्याची प्रथा सुरू झाली. जैन मंडळी जीवित हिंसा टाळत व पर्यावरणाला हातभार लागावा म्हणून सार्वजनिक ठिकाणी फटाके वाजवित नाहीत.आज या सणाला जागतिक स्वरूप येत आहे.अमेरिकेत लंडनमध्ये दिवाळीचा थाट असतो. अस्ट्रेलियात मेलबर्न येथे शासकीय खर्चाने दिवाळी साजरी केली जाते. तेथे भारतीय संस्कृतीवर आधारित कार्यक्रम घेतले जातात, फटाक्यांची आतषबाजी केली.नरक चतुर्दशी हा दिवाळीचा पहिला दिवस. पौराणिक कथा अशी आहे की, श्रीकृष्णानी अत्याचारी नरकासूराचा वध करून त्याच्या कैदेत बंदी केलेल्या सोळासहस्त्र कन्यांची मुक्तता केली.तो दिवस दुष्टाचा नाश आणि मुक्तीचा आनंद म्हणून दिवाळी साजरी केली जाते.नरकचतुर्दशी दिवशी पहाटे उठून सूर्यादयापूर्वी अभ्यंगस्नान केले जाते. नवीन वस्त्रे परिधान केले जाते देवदर्शन केले जाते. दिवाळी.यात चकली, शंकरपाळे, चिवडा,लाडू फराळ वापर केला जातो. याच दिवशी प्रदोषकाळी (सांयकाळी) लक्ष्मीचे पूजन केले जाते.व्यापारी वर्ग दिवाळीपासून नवीन आर्थिक व्यवहाराला सुरुवात करतात,ते खाते वह्यांची उत्साहाने पूजा करतात.या सणाच्या निमित्ताने स्वच्छतेचे महत्व दिले गेले आहे. दिवाळी येण्यापूर्वी घरांना रंगरांगोटी केली जाते,व घराची साफ- सफाईची कामे केली जातात जाते. या दिवशी झाडू आणून लक्ष्मी म्हणून पूजा केली जाते.प्राचीनकाळी या रात्री कुबेराची पूजा करण्याची प्रथा होती.कालांतराने कुबेराची पत्नी इरितीचे स्थान लक्ष्मीने घेतले, कुबेराच्या जागी गणपतीला प्रतिष्ठित केले गेले.लक्ष्मीपूजनाच्या निमित्त आर्थिक व्यवहारातील सचोटी, नीती आणि अर्थप्राप्तीच्या साधनाविषयी कृतज्ञता अशी दोन महत्वाची मूल्य मनात रूजतात म्हणून या पूजेची विशेषता आहे. पूर्वी दिवाळीत कडाक्याची थंडी असायची व त्या थंडीत स्नान करावे लागत असे. आता ऋतू मानात बदल झाला आहे, थंडीच गायब झाली. ते पूर्वी बाजारात आकाशदिवे विकत मिळत नव्हते.प्रत्येक जण घरीच आकाश दिवा तयार करत.त्यात रोज रोज तेलाचा आकाश दिवा लावून झेंड्याप्रमाणे उंच लावला जायचा! गरीब व सामान्य कुटुंब वर्षातून एकदा दसऱ्याला नवीन कपडे घेत असत, शिवून घेत असत! आताच्या प्रमाणे कपडे,फराळ,रेडीमेड मिळत नसत! तेच कपडे दिवाळीला घातले जायचे! कारण त्यावेळी कुटुंबाची आर्थिक बेताची होती. तेंव्हा दगडावर छडी मारण्याचे फटाके होते.तसेच लोखंडी उखळ्या होत्या,त्या अनेक प्रकार होते,मुले गंधकाव्दारे( पांढरे व पिवळे)उखळीने बार करायचे!आता प्लॅस्टीकच्या बंदुका निघाल्या आहेत. फटाक्यात सुरसरी होती. तिचा की ,शूं....ई आवाज करत उडत असे,ती घरात घुसायची!कोणाच्या कपड्यात,धोतरात घुसायची,त्यामुळे कित्येक जळून जखमी होत असत. काही ठिकाणी यामुळे आगीच्या घटना घडत होत्या! सुतळी बॉंम्ब आणि लक्ष्मी बॉम्ब या फटाक्याच्या आवाजाने परिसर हदरायचा! कानठाळी बसायची! हे फटाके धोकादायक असल्याने मोठी माणसे उडवियाचे! कांही वेळा तर सुतळी बॉम्ब हातात फुटायचा! हातातील चक्राचा



स्फोट झाल्याची घटना आमच्या घरी घडली. आमचे वडील बंधूला डोळ्याला इजा झाल्याचे मला आठवते.आता फटाके उडवविऱ्यावर निर्बंध आले आहेत!यामुळे प्रदूषण वाढते, हे खरे आहे. पण त्याला फटाके हे एकच कारण नाही.दिवाळी सणात सकाळी बाजारपेठ पहा ! रोज रस्त्यावर कचरा फेकणारी महामंडळी आहेत.महापालिकेने व्यापाऱ्यांना याबाबत शिस्त लावायला हवी. व्यापाऱ्यानी कचरा रस्त्यावर न टाकता तो एकत्रित करुन पिशवीत अथवा डब्यात ठेवावा! सफाई कर्मचारी नेतील!आज घंटा गाडीचे सफाई कर्मचारी शहरातील कचरा उचलून नेतात.त्याला नागरिकाचा प्रतिसाद मिळतो आहे. सणाच्या दिवशी सफाई कामगार काम करतात!यावेळी त्यांचेवर कामाचा ताण पडतो.त्यांचे कामाचे कौतूक केले पाहिजे.माझे कुटूंब दरवर्षी सफाई कामगारांनी दिवाळी निमित्ताने त्यांना मिठाई देऊन शुभेच्छा द्यावयाला विसरत नाही.पूर्वी दिवाळीत नातेवाईक व मित्र मंडळी हे एकमेकाच्या घरी जाऊन शुभेच्छा देत होते.प्रत्येक ठिकाणी गोड खाण्याचा आग्रह होत असत!यामुळे या दोघात प्रेमाचे,आपुलकीचे संबंध दीर्घकाळ टिकायचे! जमाना बदलला आहे.आता फेसबूक व व्हाटसअॅपवर शुभेच्छा देऊन मोकळे होतात. बलिप्रतिपदाच्या दिवशी 'ईडा पिडा टळो बळीचे राज्य येवो.असे म्हणत बळीराजाचे पूजन करण्याची प्रथा आहे.बळीराजा शेतकरी म्हंटले जाते. दिवाळीत म्हशीचे पूजा व रेड्यांच्या टक्करी होत असत.पूर्वी संगीत प्रेमी मंडळी भाव गीतांचा व भक्ती गीतांचा कार्यक्रम करत असत!तेंव्हा 'दिवाळी पहाट'ची प्रशासकीय मदतीची सांस्कतिक भूक नव्हती. तेंव्हा ' 'दिन दिन दिवाळी,गाई म्हैशी ओवाळी, गाई म्हशी कोणाच्या लक्ष्मणाच्या, लक्ष्मण कोणाचा! आई बाबाचा' हे पारंपारिक गीत ऐकायला मिळायचे!. त्यावेळी दुरदर्शन नव्हते! सर्व कुटुंब जेवत रिडीओवरील मराठी गीते ऐकण्याचा आनंद घेत जात असे.'भाऊबीज' बहिणीच्या मानाचा दिवस! बहिण भावाला ओवळते! भाऊ बहिणाला ओवाळणी म्हणून साडी किंवा थवा पैसे देत असे! या दिवशी बहिण भावाच्या येण्याची आतूरेतेने प्रतीक्षा करते.ज्याना भाऊ अथवा बहिण नाही ते मानाचा भाऊ व बहिण ओळतात ! अजून तरी मित्र व भाऊ आणि बहिणाच्या या नात्याला जात चिटकली नाही. आजही अनेक जण अनाथ,निराधार बालकांना मिठाई देऊन सण साजरा करतात. दिवाळी आनंदाचा,माणूसकी बंधूभाव,आपुलकी, वाचनाची आवड, निर्माण करणारा सण आहे.रोज मजूरी करणाऱ्यांच्या नशिबी दिवाळी कधीच नसते. अश्या माणसाना आपण सणात सहभागी करता येते का? याचाही विचार आपण केला पाहिजे.सीमेवर देशाच्या संरक्षणासाठी अहोरात्र उभा असलेल्या सैनिक व त्यांच्या कुटूबांची आठवण करून त्याना मदत देण्याचा विचार प्रत्येक भारतीयांनी केली पाहिजे.देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी दरवर्षी सीमेवरील जवानांसोबत दिवाळी साजरा करत असतात! हा उपक्रम अतिशय चांगला आहे. दिवाळी सण करताना इतरांना त्रास होणार नाही,याची काळजी घेतली पाहिजे,तरच या सणाचे महत्व आहे.

# अंतरिचेही दीप उजळू द्या....



शाम हेडाऊ
ज्येष्ठ पत्रकार, चंद्रपूर
संपर्क क्र. 9834301568

आधुनिक केसरी

**दिवाळी सण मोठा! नाही आनंदाला तोटा,असे म्हंटले जाते. बरेच जण वैयक्तीक, कौटुबिंक तर सामाजिक कार्य करुन हा सण करतात.यात त्यांना आनंद मिळतो!.काळ बदलत चालला आहे, तसे सणाचे स्वरूप बदलत चालले आहे. पूर्वी आकाश कंदीलात तेलाचा दिवा लावला जाई आता त्यात वीजेचे दिवा लावला जात आहेत!तेंव्हा नाते व मित्र मंडळी एकमेकाच्या घरी जाऊन शुभेच्छा असत! आता तर सोशल मिडीयावर शुभेच्छा वर्षाव होत आहे.आपण मोबाईलमुळे नातेवाईकांचा थेट संवाद कमी चालला असून दूरावा निर्माण होत आहे.हे सोशल मिडियाचा वापर मित्रापेक्षा शत्रू अधिक निर्माण करत आहोत!**

आनंद, उत्साह , हर्षोल्हास आणि प्रसन्नतेने आपण सगळेजण दिवाळी साजरी करतोय. घराघरावर आकाशकंदील विद्यूत रोशनाई चा हात धरून आपला रंग आसमंतात उजळून टाकतो आहे. मिणमिणत्या पणत्याही अंगणाची शोभा वाढवत आहेत. घराघरातून पहाटेच्या अभ्यंग स्नानाचा सुवास दरवळतोय तर खमंग फराळाच्या सुगंधाने मन कस चकल्या , चिवडा ,अनरसे, शंकरपाळे हे सगळं खाण्यासाठी आतूर होत चाललंय....

कुटुंबातील लहान मुलांपासून ते वृद्ध आजी आजोबा सगळ्यांचाच उत्साह या दिवाळसणात ओसंडून वहात असतो. जात ,पात, धर्म, पंथ, पक्ष , स्त्री, पुरुष, लहान, मोठा, गरिब ,श्रीमंत, शहरी असो वा ग्रामीण हा सण प्रत्येकालाच आनंद देणारा आहे. आणि हे सगळेच हा सण तितक्याच आनंदाने साजरा करतात. या सगळ्यांचे भावविश्व आपल्याला जोपासता आली पाहिजेत. ही खरी दिवाळी ठरेल. आणि म्हणूनच जितके दिवे आपण बाहेर लावतोय ना त्यातलेच काही दिवे आपण आपल्या अंतर्मनात लावू शकू का ? लावायला हवेत अस आपल्याला वाटतं का ? हो . मला आज याची गरज वाटतेय. कारण जोवर आपल्या अंतरीचे दिप प्रज्वलित होऊन आपल्या मनातील राग , लोभ, द्वेष, मत्सर, ईर्षा हे दुर होणार नाहीत ना तोवर आपण खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी केलीय अस म्हणता येणार नाही. यासाठी आणखी एक गोष्ट आपल्याला सहज करता येईल. खूप काही आपल्याला करायचं नाहीय. पण , जिथे आपण काम करतोय म ते क्षेत्र कुठलंही असो तिथेच मीही या समाजाचं काही देणं लागतो , माझेही या समाजासोबत काही ऋणानुबंध आहेत ही भावना मनात ठेवून काम केलं ना तरी आपल्या सोबत अनेकांची दिवाळी साजरी होईल. आणि म्हणूनच मला अस वाटत की आपण आपल्या दैनंदिन जीवनात करीत असलेल्या आपल्या कृतकृत्याची सार्थकता आपल्याला वाटावी अशी अंतर्मन उजळून टाकणारी ही दिवाळी असावी.

आज जग हे फार स्वार्थी होत चाललंय. व्यक्ती केंद्रीत होत चाललंय, मी आणि माझं कुटुंब हा विचार सुद्धा आता मागे पडून फक्त मी आणि माझं आयुष्य इतक्या संकुचित पातळीवर आपण आता येऊन पोहोचतोय. आई वडिलांच्या आशीर्वादाने सहकार्याने उच्च शिक्षण घेऊन आजची तरुणाई दुर देशात मोठ्या पॅकेज वर स्थिरावते आहे. आणि इथे जेव्हा आई किंवा वडिलांचा मृत्यु होतो तेव्हा बातमी कळल्यावर अंतीम संस्कार आटोपून घ्या आम्ही पैसे पाठवून देतो असा निरोप दुर देशातून आपल्याच मुलाचा



येतो तेव्हा मन पिळवटून निघतं. इथे या क्षणाला दिवाळी साजरी करतांना आम्ही या आणि अशा घटनांचाही विचार करणार आहोत का ?? आम्हाला आज दिवाळी साजरी करत असतांना यासाठी आपल्या अंतर्मनातील दीप प्रज्वलित करायचे आहेत की ज्यामुळे चांगले आचार ,विचार, चांगला दृष्टीकोन आपल्यामधे निर्माण होईल. आज जसे आम्ही आपआपली जात, धर्म विसरून सर्व समाज एकत्र येऊन ही दिवाळी साजरी करतोय हीच एकता हे राष्ट्र सर्वोपरी म्हणून कायम राहील का ?? आज या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपल्या कुटुंबापासून दुर कुठेतरी देशाच्या सीमेवर असणाऱ्या सैनिकांसोबत आपली दिवाळी साजरी करतात, ते यासाठी की आम्ही तुमच्या सोबत आहोत हा मानसिक आधार त्यांना मिळावा म्हणून. म पंतप्रधानांचा हा आदर्श प्रत्येकाने आपल्या डोळ्यासमोर ठेवायला काय हरकत आहे ? लोकप्रतिनिधींसह सर्व शासकीय अधिकारी हे त्यांच्या त्यांच्या भागात त्यांच्या त्यांच्या क्षेत्रातील अशाच काही कष्टकरी, समाजसेवी , गरीब , निराधार ,निराश्रित यांच्यासोबत ही दिवाळी साजरी करू शकेल का ? यासाठी एक पणती आपल्याला आपल्याच अंतर्मनात लावायची आहे.

खूप धावतोय आपण आज सगळेच केवळ आणि केवळ भौतिक सुखाच्या मागे. पण मनाच्या शांतींचं काय ? मानसिक शांतताही तितकीच गरजेची आहे ना ? हा विचार कधी आपण केलाय ? एक वेगळंच चैतन्य आपण अनुभवावं यासाठी ही मानसिक शांती खूप महत्वाची आहे. म्हणूनच म ही दिवाळी ही मानसिक शांतता प्रदान करणारी ठरावी चैतन्याची अनुभूती देणारी असावी असा प्रयत्न आपण करणार आहोत का ? ईतरांच सोडा , आपण प्रत्येकाने आपल्या परीने आपआपल्या जागेवर जरी हा प्रयत्न केला ना तरी खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी होईल घराघरात दीप उजळून निघतील. आणखीन एक , आज अनेक ठिकाणी स्त्री पुरुष समानतेची गोष्ट सातत्याने समोर येतेय सगळ्याच क्षेत्रात. पण मानसिक पातळीवर आपण प्रत्येकाने ही गोष्ट प्रामाणिकपणे स्विकारलीय काय ? की नुसतीच ओरड चाललीय ? जरा यावरही विचार व्हायला हवा. आणि ही समानता केवळ विचारापुरतीच मर्यादित न ठेवता ती घराघरात प्रत्यक्षात अंमलात येईल का याचाही विचार आता आपल्याला करावा लागणार आहे. कारण आता मातृशक्ती ही आपल्या खांद्याला खांदा लावून आपलं कुटुंबही आनंदाने सांभाळते आहे. नौकरी सोबत घरही ती आज आनंदाने सांभाळते आहे. तेव्हा आपणही तीला घरकामात काही मदत करणार आहोत का ? एक पणती याही विचाराची लावू या..

यासाठीच , हो यासाठीच अंतरीचेही दीप उजळू द्या , आसमंतही सारा उजळून निघेल ....
एक पणती आपणही लावू या , अंतरीचेही दिप उजळू द्या.

# निष्ठेने काम करणारी अभिनेत्री : स्मिता पाटील

आधुनिक केसरी

**चित्रपटांमधे एखाद्याचे `आत येणे ' आणि एखाद्याचे `बाहेर जाणे' हा प्रकार फार पूर्वीपासून चालत आला आहे. कोणत्या नायकाचा अथवा नायिकेचा चित्रपटात समावेश केला जाईल किंवा कोणता नायक व नायिका चित्रपटातून काढून टाकले जातील हे त्यांनाही ठाऊक नसते. अशीच घटना एका अभिनेत्रीच्या बाबतीत घडली होती. तिने एका सुप्रसिद्ध दिग्दर्शकाच्या चित्रपटात भूमिका करण्यासाठी करार केला होता. त्या अभिनेत्रीने दिग्दर्शक आणि चित्रपटातील अन्य नावाजलेल्या कलावंतांची नावे पाहून करार केलेला होता तरीही तिला मोठ्या कलावंतांमधे केवळ शोभेची बाहुली म्हणून वावरायचे नव्हते. म्हणून आपली व्यक्तिरेखा विस्ताराने समजावून घेण्यासाठी ती चित्रपटाच्या पटकथालेखककाकडे गेली.**

पटकथा-वाचनाच्या वेळी त्या अभिनेत्रीची कामाविषयी दिसलेली निष्ठा आणि तिने केलेल्या काही सूचना यामुळे तिला आपल्या चित्रपटात नायिकेची भूमिका देण्याचा निर्णय त्या पटकथालेखकाने घेऊन टाकला. प्रख्यात पटकथालेखक सागर सरहदी `बाजार' हा चित्रपट दिग्दर्शित करण्याची तयारी करीत होते त्यावेळची घटना आहे. `बाजार' हा चित्रपट निर्माण करण्याचा विचार त्यांच्या मनात आला तेव्हा त्यांनी नसिरुद्दिन शाह, सुप्रिया पाठक आणि स्मिता पाटील या कलावंतांऐवजी `इप्टा'मधून (इंडिअन पीपल्स थिएटर असोसिएशन) फारुख शेख, शौकत कैफी, युनुस परवेझ, जावेद खान, भरत कपूर, अंजन श्रीवास्तव, रीता राणी कौल आदी कलाकार घेतले. इतकेच नव्हे तर कॅमेरामन बाबा आझमी, वेशभूषाकार फरीदा सिद्दिकी आणि छायालेखक ईशान आर्य यांनाही `इप्टा'तून घेतले. निर्माते-दिग्दर्शक यश चोपडा यांच्या अर्धांगिनी पामेला चोपडाही `इप्टा'मधूनच आलेल्या होत्या म्हणून त्यांनी पामेला यांच्याकडून "चले आओ सैंया रंगीले मैं वारी रे....." हे गीत गाऊन घेतले. `बाजार'ची नायिका म्हणून शबाना आझमी यांची निवड निश्चित झाली होती. तसे त्यांच्या परिवारातील काही व्यक्ती `बाजार'शी संबंधित होत्याच. पण स्मिता पाटील यांच्या सागर सरहदी यांच्याशी एकदा झालेल्या भेटीने सगळे चित्रच पालटले आणि `बाजार'ची नायिका म्हणून शबाना आझमी



यांच्या जागी स्मिता पाटील आल्या.

प्रकार असा घडला, की त्या काळातील बड्या कलावंतांचा समावेश असलेल्या `सिलसिला' या चित्रपटाची पटकथा सागर सरहदी यांनी लिहिली होती. त्या चित्रपटात जया बच्चन यांनी केलेल्या भूमिकेसाठी स्मिता पाटील यांना आणि रेखा यांनी केलेल्या भूमिकेसाठी परवीन बाबी यांना आधी करारबद्ध करण्यात आले होते. स्मिता पाटील या चित्रपटासाठी करारबद्ध झाल्या तेव्हा त्या अतिशय आनंदित झाल्या होत्या. आपली व्यक्तिरेखा व्यवस्थित समजावून घेण्यासाठी त्या त्यांचे चित्रीकरण आटोपल्यावर थेट सागर सरहदी यांच्या निवासस्थानी गेल्या. सागर सरहदी यांना त्या म्हणाल्या, की अमिताभ बच्चन आणि यश चोपडा यांची नावे पाहूनच मी हा चित्रपट स्वीकारला आहे. या चित्रपटात संजीव कुमार आणि शशी कपूर हे दोन दिग्गज कलावंतही आहेत आणि या कलाकारांमधे मला केवळ शोभेची बाहुली म्हणून राहावयाचे नाही. म्हणून आपण मला माझी भूमिका विस्ताराने समजावून सांगितलीत तर मला त्यावर अधिकाधिक परिश्रम घेता येतील. स्मिता पाटील यांची विनंती ऐकून सागर सरहदी यांनी त्यांना पटकथा ऐकविण्यास सुरुवात केली. पटकथा ऐकवून झाली तेव्हा घड्याळात पहाटेचे ३ वाजले होते. सागर सरहदी जेव्हा स्मिता पाटील यांना पटकथा ऐकवीत होते तेव्हा त्या अत्यंत बारकाईने ती ऐकत होत्या. आपली भूमिका समजावून घेताना त्यांना जर एखादी बाब खटकली तर त्या सागर सरहदी यांना ताबडतोब थांबवीत आणि आपली भूमिका तसेच सहकलावंतांच्या भूमिकाही अधिक प्रभावी करण्यासाठी सरहदी यांना बरेच बदल सुचवीत. स्मिता पाटील यांनी सुचविलेले दमदार बदल सरहदी यांनी मान्य केले. स्मिता पाटील यांची कामावरील निष्ठा पाहून सागर सरहदी यांना त्याच क्षणी वाटले, की `बाजार' चित्रपटासाठी शबाना आझमी यांच्याजागी स्मिता पाटील यांना घेणेच योग्य ठरेल. या एका भेटीमुळे शबाना आझमी `बाजार'मधून `बाहेर' गेल्या आणि स्मिता पाटील `आत' आल्या. त्यानंतर कर्मधर्मसंयोगाने म्हणा किंवा नशिबाचा खेळ म्हणा पण परवीन बाबी यांची दिवसेंदिवस बिघडत चाललेली मानसिक स्थिती पाहून यश चोपडा यांनी आपल्या `सिलसिला' या चित्रपटातून त्यांना वगळले. परवीन बाबी `सिलसिला'मधून बाहेर जाताच स्मिता पाटीलही आपोआपच `सिलासिला'तून बाहेर गेल्या. त्यांच्या भूमिका अनुक्रमे रेखा आणि जया बच्चन यांना मिळाल्या.

**अनिल रा. तोरणे**
(तळेगाव दाभाडे)

# बँकमधील आधार काउंटर बनले शोभेचे वस्तू; अधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

## अनेक दिवसांपासून आधार कार्डचे सर्व कामकाज ठप्प

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** 'शासकीय काम आणि ८ दिवस थांब' अशी एक प्रचलित म्हण जरी असली तरी इस्टेट बँक ऑफ इंडिया लोणार शाखेने इतक्यावरच न थांबता ८ दिवसच नव्हे तर अनेक दिवसापासून आधारच्या बाबतीत तांत्रिक कारणांचा आधार घेत आधार (कार्ड) बाबतच कमालीची उदासीनता दाखविली आहे. सर्वसामान्यांची खाजगी आर्थिक लूट थांबावी व शासकीय दरात आधारचे सर्व कामकाज पूर्ण व्हावे या हेतूने शासनाने विविध शासकीय कार्यालयामध्ये आधार काउंटर सुरू केले आहे. याच अंतर्गत लोणार स्टेट बँक आणि लोणार पोस्ट ऑफिस मध्ये सुद्धा याचे स्वतंत्र काउंटर मंजूर करुन कार्यरत करण्यात आले, त्यांनी काही दिवस चांगले काम सुद्धा केले परंतु आता याला काही कामचुकार कर्मचाऱ्यांमुळे ग्रहण लागल्याचे चित्र आहे. तर दुसरीकडे खाजगी आधार सेंटर मध्ये नियमितपणे सर्व कामकाज सुरळीत सुरू आहे पण स्टेट बँक मध्ये सर्वर डाऊन आहे, मशीनमध्ये तांत्रिक बिघाड झाले, वरूनच साईट बंद आहे. असे कथित व बिनबुडाचे कारणे समोर ठेवून कर्मचारी व अधिकारी हात झटकनी करताना दिसत आहे. असेच चित्र लोणारच्या पोस्ट ऑफिस मध्ये सुद्धा पाहावयास मिळत आहे व याचा फटका सर्वसामान्यांना व विद्यार्थ्यांना बसत आहे. याकडे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वैयक्तिकपणे तातडीने लक्ष घालून ही अतिमहत्त्वाची सेवा तात्काळ नियमित करणे आवश्यक आहे. तसेच याला कारणीभूत ठरणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांवर मागील तीन महिन्यांमध्ये आधार काउंटर द्वारे झालेल्या कामकाजाचा दिनांकासहित आढावा घेऊन रितसर दंडात्मक कारवाई करणे अपेक्षित आहे. लवकरच या बाबतीत शासनाकडे पुराव्या सहित रितसर तक्रार नोंदविण्यात येणार आहे.



# टिटवी येथे दिवाळी किटचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** तालुक्यामधील टिटवी येथील दिवाळी किटचे वाटप करण्यात आले राशन दुकान मधिल ४३३ लाभार्थींना याचा लाभ मिळणार आहे. आज वाटपाची सुरूवात फुलाजी माउली आदिवासी महिला बचत गट राशन दुकान मार्फत किटाचे वॉटप करण्यात आले. लाभार्थींना सौ. गोदावरी भगवान कोकाटे माजी जिल्हा परिषद सदस्य बुलडाणा व भगवानराव कोकाटे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी सरपंच अनुशाया नरवाडे, ग्रामपंचायत सद्स्य परसराम कोकाटे, दिलीप राठोड़, मुरलीधर कुटे, ग्रामस्थ संतोष राउत, लक्ष्मण घाटे, प्रभाकर तनपुरे उपस्थित होते तर लाभार्थी गोविन्द मघाडे, भगवान ढेबरे, सरसोती अश्रुबा जाधव, सुभद्रबाई परशराम ढेबरे इत्यादी लाभार्थींना किटाचे वाटप करण्यात आले. किटमध्ये मैदा 500 ग्राम,पोहा 500 ग्राम, चनादल 500 ग्राम,पामतेल 1 लीटर, रवा 500ग्राम, साखर 1 किलो असे किट मध्ये वाटप करण्यात आले.

# समान व असमान निधी योजनांसाठी शासनमान्य ग्रंथालयांनी प्रस्ताव सादर करावेत

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** भारत सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या समान निधी व असमान निधी योजनेंतर्गत राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगिण विकासासाठी अर्थसहाय्याच्या विविध योजना ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत राबविण्यात येतात. सन २०२३ २४ साठी विविध समान व असमान निधी योजनांचा लाभ घेण्यासाठी राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून विहित नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. त्या संदर्भातील नियम, अटी व अर्जाचा नमुना प्रतिष्ठानच्या WWW.RRIF.GOV.IN या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक ग्रंथालयांनी अर्जाचा नमुना संकेतस्थळावरुन उपलब्ध (DOWNLOAD) करुन घ्यावा.

सन २०२३ २४ साठीच्या समान निधी योजना पुढील प्रमाणे आहेत. (MATCHING SCHEMES) १) इमारत बांधकाम व विस्तार अर्थसहाय्य योजना रु. २५.०० लाख

टिपः- उपरोक्त योजने व्यतिरिक्त समान निधी योजनेंतर्गत इतर योजनांचा लाभ केंद्रीय पध्दतीने देण्यात येत असल्यामुळे इतर योजनेसाठीचे प्रस्ताव सादर करु नयेत.

सन २०२२-२३ साठीच्या असमान निधी योजना पुढील प्रमाणे आहेत. (NON MATCHING SCHEMES) १) ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना ग्रंथ, साधन सामग्री, फर्निचर, इमारत बांधकाम व विस्तार यासाठी अर्थसहाय्य (फर्निचर खरेदी रु. ४.०० लाख व इमारत बांधकाम रु. १० ते १५.०० लाख) २) राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान "ज्ञान कोपरा विकसित करण्यासाठी अर्थसहाय्य - (रु. २.५० लाख) व विशेष अर्थसहाय्य आधुनिकीकरण (रु. २.०० लाख)

३) महोत्सवी वर्ष जसे ५०/६०/७५/१००/१२५/१५० वर्ष साजरे करण्यासाठी अर्थसहाय्य - (६.२० लाख / च इमारत विस्तार रु. १०.०० लाख)

४) राष्ट्रस्तरीय चर्चासत्र, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग व जागरुकता कार्यक्रम आयोजनासाठी अर्थसहाय्य

(रु. १.५० लाख / रु. २.५० लाख रु. ३.०० लाख)

) बाल ग्रंथालय व राजा राममोहन रॉय ग्रंथालय "बाल कोपरा स्थापन करण्याकरीता अर्थसहाय्य

(रु. ६.८० लाख)

उपरोक्त योजनेसाठी करावयाचा अर्ज :-

वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी प्रतिष्ठानचे WWW.RRRLF.GOV.IN हे संकेतस्थळ पहावे. आवश्यकता असल्यास संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. ग्रंथालयांनी वरील पैकी कोणत्याही एका योजनेसाठीचा प्रस्ताव विहित मार्गाने व मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह इंग्रजी / हिंदी भाषेत चार प्रतीत संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयास दि. ३०/११/२०२३ पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवावेत. असे आवाहन श्री. दत्तात्रेय आ. क्षीरसागर, ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई यांनी राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांना केले आहे.

# विद्यार्थी व पालक संवाद मेळाव्यात समिर वानखेडे करणार मार्गदर्शन

## मोप येथे संवाद मेळाव्याचे आयोजन


आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात दिवसागणिक वाढत असलेला इंटरनेटचा प्रभाव आणि त्यातून मुलांमधे वाढणारा एकटेपणा, शिवाय आजची बदललेली परीक्षा पद्धती याचा करता, मुले व पालकांमधील संवाद अधिकाधिक वाढावा ही आत्यंतिक गरज निर्माण झाली आहे. पालकांनी मुलांसाठी प्रभावी जबाबदारी पार पाडावी ही काळाची गरज ओळखून त्यासाठी प्रत्येक पालकाचे त्यांच्या मुलांसोबत मैत्री व विश्वासाचे नाते अधिक धृढ व्हावे या स्तुत्य हेतूने रिसोड तालुक्यातील मोप येथे दि.१७ नोव्हेंबर शुक्रवार रोजी सायंकाळी ६ वाजता विद्यार्थी व पालक संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील सामजिक कार्यकर्ते अमोल ज्ञानबा नरवाडे यांनी गावकऱ्यांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन केले असून, सदर मेळाव्यात युपीएससी मार्फत भारत सरकारच्या प्रशासकीय सेवेत कार्यरत असलेले बहुचर्चित अधिकारी समीर वानखेडे हे विशेष मार्गदर्शन करणार असल्याची माहिती अमोल नरवाडे पाटील यांनी दिली आहे.

विद्यार्थ्यांचे यश हे त्यांच्या जिद्द आणि आत्मविश्वासावर असते. त्यांच्या या यशाचा पाया पालकांचा सहभाग व प्रोत्सानावर अवलंबून असल्याने, आपण या संवाद मिळाव्याचे आयोजन केले असल्याची माहिती नरवाडे यांनी दिली आहे. सदर मेळाव्याचे अध्यक्षस्थान उच्चविद्याविभूषित असलेले युवा आमदार अमित झनक भूषविणार आहेत. तर एमपीएससी







मार्फत तहसीलदार पदावर नियुक्त झालेल्या आणि रिसोड तहसीलच्या पहिल्या महिला तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.तद्वतच परभणी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष राजेशभैय्या पाटील गोरेगावकर, आपस्वामी शिक्षण संस्थेचे संचालक भाऊसाहेब काळे, इंडियन बँक रिसोडचे व्यवस्थापक विशाल माने, समीर वानखडे विचार मंच प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन साईवाला, पंचायत समितीच्या उपसभापती सुवर्णा शैलेश नरवाडे, सरपंच भागवत डीगांबर नरवाडे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या निमित्ताने विविध क्षेत्रात कौतुकास्पद नाविन्य प्राप्त करणारे परिसरातील मान्यवरांचा नागरी सत्कार सुद्धा करण्यात येणार आहे. त्यामध्ये भारतीय लष्करात सेवा देणारे माजी सैनिक श्री किसनराव नरवाडे, पत्रकार वसंत खडसे, बालाजी सूतगिरणीच्या संचालक सौ. राणी रवींद्र नरवाडे, समीर वानखडे विचार मंच सरचिटणीस विजय पंडित,तसेच अगदी कमी वयात व अल्पावधीत ग्राफिक्सच्या व्यवसायात उंच भरारी घेणारे श्री अमोल शालिग्राम खडसे आदींचा समावेश असल्याची माहिती अमोल ज्ञानबा नरवाडे यांनी दिली आहे.



दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा
अंजना स्कूल ऑफ एक्सलन्स, आसेगाव
अत्यंत सुसज्ज इमारत व आधुनिक सुविधा उपलब्ध
हॉस्टेल सुविधा उपलब्ध, आधुनिक सुविधा उपलब्ध, ट्रान्सपोर्ट सुविधा उपलब्ध
डिजिटल क्लासरूम, प्रोजेक्टर रूम, कॉम्प्युटर लॅब व सायन्स लॅब उपलब्ध


दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
गणेश खाडे
विचारवंत, साहित्यिक, लेखक, अध्यात्मिक मार्गदर्शक तथा
संस्थापक अध्यक्ष वंजारी महासंघ महाराष्ट्र


दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
ग्रुप ग्रामपंचायत
शरणापूर-धरमपूर
ता. जि. छत्रपती संभाजीनगर
श्री.एस.बी. बनकर
ग्रामसेवक
मो. 9765353325
श्री. मोरे शिवाजी आसाराम
उपसरपंच
मो. 9850946011
सौ. सदावर्ते संध्या संदीप अप्पा
सरपंच
मो. 9049137070
सन्माननीय ग्रामपंचायत सदस्य
श्री. एस.बी. बनकर, ग्रामसेवक सौ. सदावर्ते संध्या संदीप अप्पा, सरपंच
श्री. मोरे शिवाजी आसाराम, उपसरपंच
सौ. तोटवाड उज्वला बालाजी, सदस्य, श्री. कान्हेरे कुंतल रामेश्वर, सदस्य
श्री. कान्हेरे आदेश भाऊसाहेब, सदस्य, सौ. तुपे सविता राजेंद्र, सदस्य
सौ. भंवर मुक्ता विलास, सदस्य, श्री. कान्हेरे कल्याण चंद्रभान, सदस्य
सौ. मोरे मीराबाई भागीनाथ, सदस्य, सौ. कान्हेरे अश्विनी दीपक, सदस्य
कर्मचारी वर्ग
आर.के. साठे (ग्रा.पं. लिपिक)
बाबासाहेब रामचंद्र कान्हेरे (पा.पु.)
ज्ञानेश्वर अप्पाराव कान्हेरे (शिपाई)
आर.के. कान्हेरे (केंद्र चालक)


दिपावली
निमित्त तुम्हाला व तुमच्या कुटुंबियांना
हार्दिक शुभेच्छा !!
प्रा.डॉ.गोपालसिंग बछीरे
जिल्हा संघटक शिवसेना संघटक


दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
लक्ष लक्ष दिव्यांनी उजळू दे आकाश
होऊ दे दुष्ट शक्तींचा विनाश
मिळो सर्वांना प्रगतीच्या पाऊलवाटेचा प्रकाश
असा साजरा होवो आपला सर्वांचा
दिवाळी सण खास
दीपावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
पवन धायगुडे
खंडाळा तालुकाध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए)


Ajeet Seeds Pvt. Ltd.
आपणास व आपल्या परिवारास दिपावलीच्या
आरोग्यमय, प्रकाशमय, चैतन्यदायी,
मंगलमय शुभेच्छा !!!
शुभ दिपावली
FOLLOW US ON
www.ajeetseed.co.in


दिवाळी स्पेशल ऑफर
तान्हाई ड्रेसेस
दिपावली
निमित्त तुम्हाला व तुमच्या कुटुंबियांना
हार्दिक शुभेच्छा !!
3300/-
1550/-
2600/-
ऑफर १६ ऑक्टोबर पर्यंत...
शैलेश सरकटे
अध्यक्ष:- ह्युमॅनिटी सोशल फाऊंडेशन
बबलु सरकटे
(तान्हाई ड्रेसेस)

# आठवण एका सुहृदयस्थ व्यक्तिमत्वाची...



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**फाल्गुन महिना संपून चैत्राचे आगमन झाले होते. बोचरी थंडी आता कमी झाली होती. पानगळती होऊन झाडांवर नवे अंकुर फुटू लागलेले. कडुनिंबाची झाडे हिरवीगार आणि तौराने लडबडून गेलेले.हवेतला गारवा नाहीसा झालेला. रानशिवारातील हिरवळ लुप्त होऊन वाऱ्यासंगे पालापाचोळा उडत होता. शेतकऱ्यांनी जनावरांना चरण्यासाठी वावरात मोकळे सोडले होते. सुगीची कामे संपल्याने घराघरांतील बाया आता घरकामात दंग झालेल्या. कोणी शेवया करतंय, कोणी पापड, कुरुड्या घालतेय, कोणी डाळी बनवतंय तर कोणी साळी कांडतंय. अशा या वातावरणात बौद्ध वाड्यातील आम्ही पोरं विटीदांडू खेळात रमलो होतो.**

रविवारचा दिवस म्हणजे आमच्यासाठी दिवसभराच्या खेळाची पर्वणीच. दुपारपासून आम्ही विटीदांडू खेळाचा डाव मांडलेला. सायंकाळचे पाच वाजले होते.खेळून खेळून आम्ही थकलो होतो. शेवटचा डाव सुरु होता.आणि नेमके त्याचवेळी गावातील एक व्यक्ती बौद्ध वाड्याकडे येताना दिसली.अंगात खादीचा सदरा आणि पांढरे शुभ्र धोतर,हातात काठी,गळ्यात मफलर,खिशाला शेतकरी संघटनेचा बिल्ला अशा वेशातील मध्यम उंचीचे व करारी चेहऱ्याचे ते कणखर व्यक्तिमत्त्व होते स्वातंत्र्यसैनिक कालिदासराव देशपांडे.

आमच्या गावाचे थोर सुपुत्र कालिदासराव देशपांडे हे मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिक होते आणि त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. सगळा गाव त्यांना आदराने काका म्हणायचा. असे हे काका चालत चालत आमच्या जवळ आले आणि आम्ही आमचा खेळ बंद केला. आम्ही त्यांच्या भोवती गोळा झालो. काकांनी मग खेळापासून सुरुवात करुन अभ्यासापर्यंत आमचा समाचार घेतला आणि आम्हाला उद्देशून म्हणाले,'खेळ खेळणे चांगली गोष्ट आहे पण अभ्यास करणे त्याहूनही अधिक चांगली गोष्ट आहे,हे तुम्ही लक्षात घेतले पाहिजे.'

बोलत बोलत आम्ही आमच्या घरापुढे आलो.काकांना बसण्यासाठी मी आमच्या घरातील लाकडी स्टूल आणून दिला. काका त्यावर बसले आम्ही त्यांच्याभोवती रस्त्यावर बैठक मारली. मग त्यांनी आम्हाला अनेक चांगल्या गोष्टी सांगितल्या. अभ्यास करण्याचा सल्ला दिला.माझ्या आईने फुटक्या कपबशीत काकांना चहा आणून दिला. फुरके मारीत काकांनी चहा संपवला आणि



म्हणाले, 'यावर्षी आपणाला बाबासाहेबांची शंभरावी जयंती साजरी करायची आहे. तुम्ही पोरांनी चांगली भाषणे करायची. मिरवणुकीत घोषणा द्यायच्या पण नाचायचं नाही. समजलं काय?'

माना डोलवत आम्ही होकार दिला. आमच्या गावात बाबासाहेबांचा जयंती सोहळा त्यांच्याच पुढाकाराने सुरू झाला होता.बाबासाहेबांचे विचार, कार्य आणि जीवनसंघर्ष त्यांच्यामुळे आमच्या गळी उतरला होता. गावातील पराकोटीचा जातीभेद त्यांनी संपुष्टात आणला होता. जातीचा संबंध नव्हता की गोताचा परंतु त्यांनी आमच्या सोबत, आमच्या समाजासोबत जी नाळ जोडली होती ती म्हणजे मानवतेच्या विचारांची, आंबेडकरवादाची आणि बुध्दांच्या शिकवणुकीची...


काकांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही बाबासाहेबांचा जन्मशताब्दी जयंती सोहळा त्यावर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला. आम्ही पोरांनी मोडकीतोडकी भाषणे केली ती काकांना आवडली. मिरवणुकीत बाबासाहेबांच्या घोषणा देऊन गाव निनादून सोडला.नाचणाऱ्या तरुणांनी नशापान न करता नयनरम्य डान्स केला.रात्री सुप्रसिद्ध विचारवंताचे व्याख्यान मंत्रमुग्ध करणारे झाले. जयंतीदिनी सकाळपासून ते व्याख्यान संपेपर्यंत काका आमच्या सोबत होते ते कुठेही हलले नाहीत. असे हे मानवतावादी काका आमचा आदर्श होते. दहावी बोर्ड परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यानंतर मी उच्च शिक्षणासाठी लातूर शहरात दाखल झालो होतो. तेथे काकांच्या विचारांची शिदोरी सोबत होतीच. दीर्घ सुट्टीत गावी परतलो.काकांना भेटण्याची तीव्र इच्छा झाली. त्यांच्या घराकडे जाताना वर्गमित्राने जी गोष्ट सांगितली ती विश्वास बसणारी नव्हती. दोन महिन्यांपूर्वीच काकांनी जगाचा निरोप घेतला होता. त्यांचे निधन झाले होते. हे ऐकून माझ्या पायाखालची वाळू सरकली... हृदय धडधडले... काकांच्या आठवणी मनात दाटून आल्या... काकांना जाऊन आता बरीच वर्षे उलटली तरीही काका आजही जसेच्या तसे आठवतात...कारण त्यांचे कर्तृत्व आणि व्यक्तित्वच तसे होते समाजरुपी वावरात माणुसकी पेरणारे...

## 'प्रकाशयात्री' सुरळीत वीजपुरवठ्यासाठी कर्तव्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दिवाळी म्हणजे आनंदोत्सवासह प्रकाशाचा अन् दिव्यांनी आसमंत उजळून टाकण्याचा सण. आधुनिक काळात रंगीबेरंगी आकाशकंदील, विजेच्या दिव्यांनी दिवाळी प्रसन्नता देतात. ही प्रसन्नता कायम ठेवण्यासाठी आणि दिवाळीला खऱ्या अर्थाने प्रकाशमान ठेवण्यासाठी महावितरणचे कर्मचारी ऐन दिवाळीच्या दिवसांतही कर्तव्यावर आहेत. इतर नागरिक दिवाळी साजरी करीत असताना वीजयंत्रणेत कुठेही आणि केव्हाही बिघाड झाल्यास किंवा काही अडचणी निर्माण झाल्यास जनमित्र ते अभियंते प्रकाशदूताप्रमाणे तत्पर आहेत. घरातील विजेच्या एका बटनामागे अजस्र यंत्रणा आणि हजारो कर्मचाऱ्यांचे जाळे असते. काही अडचणींमुळे वीज गेल्यास जवळपास सर्वच कामे ठप्प होतात. त्यामुळे नागरिकांची चिडचिड होते. काही वेळेला वीज कर्मचाऱ्यांवर संताप व्यक्त केला जातो. इतर कोणत्याही वेळेला हा संताप तीव्रच असतो. त्यात ऐन दिवाळीतच वीज गायब झाल्यास काय होईल, याची कल्पना करता येणार नाही. त्यामुळेच भल्यामोठ्या वीजयंत्रणेवर सणाच्या काळामध्ये डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित असते.

दिवाळीत सार्वजनिक सुट्टी असली, तरी महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील ३ हजारांहून अधिक अभियंते, तंत्रज्ञ आणि वीज उपकेंद्रांतील यंत्रचालक त्यांच्या वेळेनुसार कर्तव्यावर हजर आहेत. दिवाळीच्या संपूर्ण दिवसांमध्ये वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याचे कर्तव्य ते बजावीत आहेत. दिवाळीत फटाक्यांमुळे आग लागून, शॉर्टसर्कीट होऊन वीज जाण्याच्या घटना होतात. त्यावेळी कोणत्याही वेळेला तंत्रज्ञांना पोहोचावे लागते. समस्या गंभीर असल्यास इतर सर्व कामे सोडून अभियंत्यांनाही संबंधित ठिकाणी पोहोचावे लागते. त्यामुळे नागरिकांची दिवाळी सुखकर करण्यातच आमची दिवाळी असल्याची भावना कर्मचारी बोलून दाखवितात.



दिवाळी प्रकाशाचा सण असल्याने चोवीस तास वीजपुरवठा सुरू ठेवण्यासाठी महावितरणचे कर्मचारी सज्ज आहेत . वीज यंत्रणेवर काम करणारे जनमित्र, अभियंता हे खऱ्या अर्थाने प्रकाशयात्री आहेत . विजेच्या एका बटनामागे भलीमोठी यंत्रणा असते . त्यामुळेच इतर नागरिक दिवाळी साजरी करत असताना त्यांची दिवाळी प्रकाशमान ठेवण्यासाठी महावितरणचे कर्मचारी कर्तव्य बजावत आहेत . – **डॉ .मुरहरी केळे, मुख्य अभियंता, महावितरण, छत्रपती संभाजीनगर परिमंडल**

## ऊसतोड कामगारांच्या पालावर दिवाळी साजरी

### कै.आनंदा सूर्यवंशी चॅरिटेबल ट्रस्टकडून फराळाचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** दिवाळीचा सण ऊस तोड कामगारांना आनंदाने साजरा करता यावा म्हणून त्यांच्या पर्यंत दिवाळी फराळ पोहच करण्याचे व सामजिक बांधिलकी जपणारे महत्वपूर्ण कार्य दरवर्षी कै.आनंदा सूर्यवंशी चॅरिटेबल ट्रस्टकडून केले जात असते. ऐण सणासुदीच्या काळात ऊसतोडीसाठी आलेल्या ऊसतोड कामगार दिवाळी सणापासून वंचित राहू नये याच करिता त्यांच्या सोबत दिवाळी साजरा करण्याचा आनंद यावर्षी सुद्धा कै.आनंदा सुर्यवंशी चॅरिटेबल ट्रस्ट पाडेगाव व मांगल्य शिक्षण प्रसारक संस्था पुणे यांनी घेतला.४५० कुटूंबा पर्यंत त्यांनी दिवाळी फराळ देऊन पालावरच्या लोकांची दिवाळी गोड केली. पुरंदर,खंडाळा व फलटण तालुक्यातील ऊसतोड कामगारांच्या पालावर व तळावर जाऊन हे कार्य पार पाडत असताना या लोकांसोबत खरी दिवाळी साजरी करण्याचे समाधान मिळत असल्याचे म्हटले जात असते.

लाडू, करंजी, चिवडा, चकली आदी पदार्थांचे ट्रस्टच्या उपाध्यक्षा श्रीमंती विमल सुर्यवंशी यांनी स्वतः इतर महिलांच्या मदतीने बनवून ४५० पाकिटे पॅकिंग हे पाडेगाव फार्म,सालपे, चव्हाणवाडी ता.फलटण व बाळूपाटलाचीवाडी, खेड ता.खंडाळा आणि पिंपरे ता. पुरंदर या ठिकाणी उतरलेल्या तळावर जाऊन फराळाचे वाटप करण्यात आले. हे फराळ वाटप पवन सुर्यवंशी, तानाजी खुडे,विलास सुर्यवंशी,सुनील भोसिकार यांनी केले. यावेळी चव्हाणवाडी येथील टोळीचे व्यवस्थापाक सतीश शिंदे,हेमंत निंबाळकर,सालपे येथील टोळीचे व्यवस्थापाक दिपक शिंदे हे सर्व उपस्थित होते. संस्था व ट्रस्ट यांनी मागील ४ वर्षांपासून फराळाचे वाटप करण्याचा उपक्रम सुरू केला असून या वर्षी ४५० ऊसतोड कामगारांच्या मुले व कुटुंबियांना छोटा मदतीचा हात व सर्वांच्या घरी फराळाच्या पदार्थाचा आस्वाद घेणे सुरू असताना यांच्या मुलाबाळांना फराळ मिळावा या उद्देशाने हे फराळाचे वाटप करण्यात आले.या सेवेबद्दल लोकांकडुन कै.आनंदा सूर्यवंशी चॅरिटेबल ट्रस्टचे विशेष कौतुक होत आहे.



## खुलताबाद दर्गाह कमिटीतर्फे होमिपॅथिक आरोग्य शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** येथे दर्गा कमिटी व सायली ट्रस्टच्या वतीने मोफत होमिपॅथीक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान १०८ रुग्णाची आरोग्य तपासणी करून त्यांना होमिओपॅथिक औषधे वाटप करण्यात आले. दर्गा कमिटी हद्दे कला व सायली महाविद्यालय ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने या होमिओपॅथीक आरोग्य शिबिराची आयोजन करण्यात आले होते. सायली महाविद्यालयाचे प्राचार्य तथा ट्रस्टच्या चेअरमन डॉ.उमा कुलकर्णी यांचा दर्गा कमिटी तर्फे अध्यक्ष इजाज अहमद, उपाध्यक्ष मतीन जहागीरदार सचिव यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी दर्गा कमिटी सदस्य तथा माजी नगराध्यक्ष ॲड. कैसरोद्दिन यांनी डॉ.उमा कुलकर्णी व त्यांचे सर्व सहकारी विद्यार्थी यांना येथील दर्गा बाबा बुर्हानोद्दीन गरीब नवाज, ख्वाजा जर्जरी जर बक्ष, तसेच तालुक्यातील ऐतिहासिक पार्श्वभूमी व धार्मिक महत्त्व बद्दल सविस्तर माहिती सांगून येथील सामाजिक सलोख्याचा उल्लेख केला. यावेळी सदस्य मुबशिरोद्दिन अमिरोद्दीन, सालेह महम्मद, हबीब टेलर, अबरार अहमद, डॉ. नाजनिन, डॉ .कांचन, डॉ. सुजाता डॉ. भालचंद्र, डॉ.आफिया, डॉ.अफशिना, डॉ.उजेका मोमीन, डॉ. निलेश, डॉ. चव्हाण, डॉ. हेमलता, डॉ. पूजा, डॉ. तहुरा, डॉ. रेहान, डॉ. हसन, डॉ. गुरुनाथ, डॉ. साउद, आदींची उपस्थिती होती.

## खुलताबाद तालुक्यातील तिन्ही मंडळ दुष्काळी सदृश्य यादीत समाविष्ट

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी, सुलतानपूर, वेरुळ तिन्ही महसूल मंडळांचा दुष्काळ सदृश्य परिस्थिती यादीत समाविष्ट करण्यात आल्याने सर्वसामान्य शेतकऱ्यांना सवलती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. खुलताबाद तालुक्यात यंदा सुरवातीपासूनच पावसाने हुलकावणी दिल्याने गत वर्षांच्या तुलनेत सरासरी एवढा ही पाऊस झाला नाही.तर ५०%पेक्षा कमी पर्जन्यमान झाल्याने व तुरळक पावसामुळे खरिप पिक हंगाम वाया गेले तर आता रब्बी पिक हंगाम ही पावसाअभावी वाया गेल्यात जमा झाले आहे. तिन्ही महसूल मंडळ मधे पावसाअभावी पिके गेली तरी ही प्रशासनाने ४८%पेक्षा कमी नजरपाहणी व आणेवरी दाखवली नसल्याने तिन्ही महसुल मंडळ दुष्काळी सदृश्य स्थीती असताना प्रशासनाने दुष्काळी सदृश्य परिस्थिती यादीत समाविष्ट केला नव्हता.जेव्हांकी शेतीस्तरावरुन कृषी सहायक,ग्रामसेवक तलाठी मंडळ अधिकारी तहसीलदार यांना याचे प्रत्यक्ष पाहणी देखरेख केलेली व तसा आहवाल देवूनही व वेळोवेळी शेतकरी व विविध पक्ष संघटना सामाजिक कार्यकर्ते यांनी निवेदनाद्वारे मागणी करूनही तिन्ही महसूल मंडळ दुष्काळी सदृश्य परिस्थिती यादीत समाविष्ट करण्यात आले नव्हते परंतु आता बाजार सावंगी सुलतानपूर वेरुळ तिन्ही महसूल मंडळ दुष्काळी सदृश्य परिस्थिती यादीत समाविष्ट करण्यात आल्याने शेतकऱ्यांना दुष्काळी सदृश्य योजनेत लाभ मिळणार असल्याने शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला.



दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा
फक्त पोकळ गप्पा नाही...तर 'काम' हीच आमची ओळख !
समाधान पाटील नवले
तालुकाध्यक्ष, भाजपा सोशल मिडिया, फुलंब्री विधानसभा
आन्ना मैंद
ग्रा.पं. सदस्य तथा तालुका उपाध्यक्ष, भाजपा ओबीसी मोर्चा, फुलंब्री विधानसभा




आधुनिक केसरी
दीपावलीनिमित्त
हार्दिक
शुभेच्छा!
शिवसेना
ॲड. सुनील शिवाजीराव बुधवंत
शिवसेना तालुका प्रमुख, जिंतूर




शुभ दिपावली
सुरेश कुंडलिकराव नागरे




रजि. नं. महा/अजीडी/3/एफ-2020 / 1991
स्थापना 2007-2008
ज्ञानकुंज शिक्षण प्रसारक मंडळ औरंगाबाद
(शासन मान्य - अंशतः अनुदानित / स्वयं अर्थसहाय्यीत)
ज्ञानकुंज कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व ज्ञानकुंज इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल
बाजारसावंगी, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद
EMAIL : ARTS.COM.SCI.JR.COLLEGE@GMAIL.COM EMAIL : DNYANKUNJIES 2020@GMAIL.COM
(कॉलेज) मो. 9637739326, 7262021814 ( स्कूल ) मो. 9960633927, 9049730518
कार्यालय दुरध्वनी क्र. : 02437-297150
मा. विजय झारकुंडे
अध्यक्ष, ज्ञा.शि.प्र. मंडळ, औरंगाबाद जिल्हाध्यक्ष, म.रा.शि. संस्थाचालक महामंडळ
प्राचार्य विजय झारकुंडे
ज्ञानकुंज कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व ज्ञानकुंज इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल, बाजारसावंगी
मा. भाऊसाहेब काळे
सचिव, ज्ञा.शि.प्र. मंडळ, औरंगाबाद संचालक, लोकविकास नागरी सह. बँक, औरंगाबाद




तुझ्यासाठी काहीही...
Trailer
अवयव दानावर आधारीत व ऑस्कर पुरस्कार 2023 साठी
5 विभागामध्ये पात्र ठरलेल्या मराठी चित्रपटाच्या निर्माती
सौ. कल्पना संजय गायकवाड (मुखेडकर) यांच्याकडून
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...!




शुभ दिपावली
निमित्त सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा




जाधव नर्सींग होम & ICU सेंटर
जाधव डाग्नोस्टीक सेंटर, कन्नड
दिपावली
निमित्त सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा ...!
डॉ.एस.जे.जाधव
(M.B.B.S.D.G.O.) स्त्री रोग तज्ञ
डॉ.रविराज जाधव
M.B.B.S DGO DMRE रेडिओलॉजीस्ट
डॉ.श्वेता बलवीर
(M.B.B.S., M.S., O.B.G.Y.) (स्त्री रोग तज्ञ)
डॉ.विलास सदाफळे (पाटील)
B.H.M.S. C.C.M.P.
डॉ.उमेश वृहेतकर
B.H.M.S.
Fellowship in KEM Hospital Pune General Physician
डॉ.उल्हास ऋषी
Fellowship in I.C.U.
डॉ.शाजीया पठाण
B.U.M.S. C.G.O.
फॅमिली फिजीशियन
उपलब्ध सुविधा
वेदनारहीत बाळंतपण ( Painless Delivery )
संपूर्ण प्रसुती पुर्व/प्रसुती नंतर तपासणी
माफक दरात सिजरीयन ची व्यवस्था
सरकार मान्य कुटुंब नियोजन व गर्भपात केंद्र
व्यधंत्व निवारण केंद्र (मुल,बाळ होण्यासाठी उपचार)
प्रसुती गृह बाळंतपणाची व्यवस्था
किशोरी क्लिनीक वयात येणाऱ्या मुलींसाठी
अति दक्षता विभाग I.C.U.
ऑक्सीजन ची सुविधा
गर्भपिशवीचे दुर्बिणीद्वारे ऑपरेशन
स्तनाचे आजार व उपचार
मासिक पाळीचे आजार व उपचार
माफक दरात गर्भपिशवीचे
ऑपरेशन (कॅम्प दर शुक्रवारी)
I.U.I.ची व्यवस्था
सोनोग्राफी उपलब्ध
व्हेंटीलेटर सुविधा उपलब्ध
छाजेड नगर,कन्नड जि.छ.संभाजीनगर
02435 - 221241 8888648762 / 63
डॉ.सदाशिव पाटील
ॲडमिनीस्ट्रेटीव ऑफिसर




हार्दिक शुभेच्छा...!
कारखान्याची वैशिष्टये:
CBSE BOARD Affiliation No 1131321
बोर्डीकर पोदार लर्न स्कूल, परभणी रोड, जिंतूर मो. 9028902511, 9028892511
ब्रम्हा व्हॅली स्कूल कोल्हापाटी, मानवत रोड ता. मानवत मो. 9370195493, 8421288224
बोर्डीकर पोदार लर्न स्कूल, सेलू मो. 9028541235, 9028531235
सौ. भावनाताई बोर्डीकर मुंगसे पाटील

# दिवाळी 'जय जवान - जय किसान'मय व्हावी !

आधुनिक केसरी

**यंदाची दिवाळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हिमाचल प्रदेश राज्यातील लेपचा येथील सैनिकांसह साजरी केली. 'पंतप्रधान, मुख्यमंत्री नसतानाही सणासुदीला सीमेवर जायचो. गेल्या ३० - ३५ वर्षांत अशी एकही दिवाळी नाही, जी मी तुमच्यासह साजरी केली नाही.' पंतप्रधानांच्या या बोलण्यातून लक्षात येते की, पंतप्रधान झाल्यावरही त्यांना सीमेवर जाऊन सैनिकांसह दिवाळी साजरी करणे शक्य का झाले ? कारण त्यामागे एक प्रदीर्घ तप आहे. पंतप्रधानांचे विचार सर्वांनाच पटत असतील - नसतील. मात्र देशाच्या सैनिकांसह दिवाळी साजरी करण्याची त्यांची कृती नक्कीच आतापर्यंतची सत्ताधारी मंडळी, पंतप्रधान यांच्यापेक्षा हटके आहे.**

'जय जवान - जय किसान' ही घोषणा तत्कालीन पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री यांनी दिली आहे. भारत विविध क्षेत्रात प्रगती करत आहे. पैकी एक लक्षवेधी क्षेत्र म्हणजे आयटी क्षेत्र. असे असले तरी देशाच्या एका किमयागारावर नागरिकांच्या संरक्षणाचे तर दुसऱ्यावर त्यांच्या शेतमालविषयक आवश्यकतांची पूर्तता करण्याचे दायित्व आहे. वर्ष २०१४ मध्ये सत्तेत आल्यापासून पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी प्रतिवर्षी देशाच्या विविध भागांतील सैनिकांसह दिवाळी साजरी करत आहेत. यासह शेतकरी वर्गासहसुद्धा दिवाळी साजरी करता येईल. त्यांच्याही पाठीवर पंतप्रधानांच्या कौतुकाची थाप पडली तर त्यांनाही चांगले वाटेल, त्यांचा उत्साह वाढेल. शेतकरी भोळा आहे. ऊन, पाऊस आणि बोचरा वारा यांची काळजी न करता मेहनत करणारा हा वर्ग दुर्लक्षित राहू नये. कोरडा - ओल्या दुष्काळाचा फटका त्यांना बसल्यावर काहींना आर्थिक साहाय्य मिळते, तर काहींना मिळत नाही. अशी ओरड ऐकू येत असते. मेहनत तर साहाय्य मिळालेले आणि न मिळालेले दोघेही करतात. मग आर्थिक साहाय्य मिळताना असे का होते ? पाणी कुठे मुरत आहे ? याचा छडा लागला पाहिजे. 'आंधळ दळतय आणि कुत्र पीठ खातय' असे कुठपर्यंत चालणार ? गेल्या काही वर्षांपासून निसर्गाचे चक्र बिघडल्याने शेतकऱ्यांना हानीचा फटका कधी बसेल ? हे सांगता येत नाही. तसेच एक वर्षांत असे किती वेळा होईल हेही अनिश्चित असते. यासह कधी शेतमालाला चांगला भाव मिळतो तर कधी भाव घसरल्याने शेतमाल रस्त्यावर टाकला जातो. या वर्गाच्या शेती करण्याच्या धाडसी निर्णयाचे कौतुक वाटते. मिळतो तेव्हा चांगला नफा आणि नाही तेव्हा दुबार - तिबार पेरणी करूनही तोटाच पदरी पडतो. तरीही निराश न होता या वेळी नफा मिळेल या आशेवर पुनःपुन्हा शेती करत राहणे नक्कीच येरागबाळ्याचे काम नाही. त्याग - मेहनत - संयम यांची कठोर परीक्षा पदोपदी द्यावी लागते.

अशातच जेव्हा शेतकरी आत्महत्येचे वृत्त येते तेव्हा खेद वाटतो. भारत या समस्येच्या मुळाशी जाऊन त्यावर तोडगा काढण्यात कमीच पडला आहे. एक शेतकरी कमी होणे म्हणजे एक मेहनती माणूस गमावणे होय. त्याच्याकडे आर्थिक श्रीमंती नसली तरी मनाची श्रीमंती आहे. याची प्रामाणिकपणे नोंद घेतली पाहिजे. आतंकवाद्यांशी होणाऱ्या चकमकींत सैनिक हुतात्मा होतात. तेव्हाही एक शूर सैनिक गमावल्याची भावना असते.

सांगण्याचे तात्पर्य हेच की, शेतकरी असो वा सैनिक दोघेही आपले जीवन तळगतावर घेऊनच जगत असतात. असे म्हणता येईल. नोकरी करणाऱ्या पगारदार माणसाला प्रत्येक महिन्याच्या निश्चित दिनांकाला वेतन मिळत असते. जीवाची असुरक्षितता हा विषय ध्यानीमनी नसतो, नोकरीवरून पुन्हा घरीच जायचे असते. यांच्याकडून प्रतिदिन काही तास कामावर भरले जातात. तर कधी अतिरिक्त कामही करावे लागते. असे असले तरी महिन्याला वेतन मिळतेच मिळते. त्यावर कुटुंब चालते. शेतकऱ्यांना असे काही नसते. यांच्या तुलनेत गलेलठ्ठ वेतन, भत्ते, बोनस घेणारे सरकारी कर्मचारी काय काम करतात ? हे सर्वश्रुत आहे. भरमसाठ सार्वजनिक सुट्ट्या, साप्ताहिक सुट्ट्या लक्षात घेता सरकार यांच्यावर जी आर्थिक खैरात करत असते. त्याचे फलित म्हणजे केवळ सरकारी मतदार राजाचे पोषण करणे असेच आहे. या तुलनेत बिचारा शेतकरी मात्र हानी झाल्यावर आर्थिक साहाय्य मिळण्यासाठी टाहो फोडतो. यावरून गलिच्छ राजकारण चालू होते. ते करणारे केवळ राजकारण करण्यासाठीच पुढे असतात. वेळ पडल्यास स्वतःच्या खिशातील चार पैसे शेतकऱ्यांना देण्याची धमक यांच्यात नसते. त्यामुळे सरकारने घोषित केलेल्या दुष्काळी पॅकेजचा लाभ कधी पदरी पडतो ? याच एकमेव आशेवर राहावे लागते. हौशेगौशे तर केवळ राजकारण करून बाजूला होतात. तेच त्यांना जमू शकते. यांना



केवळ स्वतःच्या चमकोगिरी व्यतिरिक्त कोणाशीही देणेघेणे नसते. हीच यांची खरी ओळख. भरल्या पोटी तृप्ततेचा ढेकर देत आंदोलन - उपोषण करणे म्हणतात ते हेच. यांना माणुसकी शून्यतेचे प्रतिक म्हणता येईल.

कृषी विभागाचे कार्य काय? शेतकरी वर्गासाठी कोणत्या योजना आहेत ? इत्यादी प्रश्न तर यांच्या गावीही नसतात आणि चालले शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवायला. शालेय स्तरापासून अभ्यास करण्याची सवय असावी लागते. ती नसली की भविष्यात कुठल्याही विषयी अभ्यास करावासा वाटत नाही. मग त्या रिकाम्या डोक्यात उरले काय ? तर कटकारस्थाने आणि स्वार्थी राजकारण. कोणत्याही विषयावर दोन वाक्य नीट बोलू न शकणारे नाटकबाज कधीतरी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावू शकतील का ? तर नाही. ते केवळ राजकीय पक्षांच्या बॅनर्सवर गॉगल, विचित्र केशरचना या अवतारात दिसतील. राजकीय पक्षांकडे मनुष्यबळ आहे. पण त्यातील बहुतांश कार्यकर्ते - पदाधिकारी तर आपल्याच तोऱ्यात असतात. त्यामुळे त्यांना आजूबाजूला आक्रोश करत असलेला शेतकरी दिसत नाही. पक्षाचे नाव, पद यांचा उपयोग करून 'मी सत्ताधारी पक्षाचा' अशी छाप कशी निर्माण करता येईल यासाठीच झटत असतात. निवडणुका लढवणे तर आवडता छंद. केवळ स्वतःभोवती फिरणाऱ्या या स्वार्थींना स्वतःचा फायदा असल्याशिवाय कोणाही भोवती फिरण्यात वेळ घालवण्यात काडीचाही रस नसतो. ते मायबाप शेतकरी वर्गासाठी रक्ताचे पाणी काय करणार ? कार्यकर्ते - पदाधिकारी - नेते यांना घडवण्यात राजकीय पक्ष चुकत आहेत. हाती घेतलेले सूत्र पूर्णपणे मार्गी लागेपर्यंत न सोडणे, मी इतक काम करत आहे तर मला काहीतरी विशेष पद - निवडणूक तिकीट मिळाले पाहिजे अन्यथा असंतोष व्यक्त करत दुसऱ्या पक्षात प्रवेश करायचा. शाळेत असताना विविध इयत्तांत अनुत्तीर्ण झाल्यावर एका वर्गात किती वेळा बसणे झाले असेल ? याचा थांगपत्ता नाही. पण वर्तमान राजकीय पक्षात स्वतःला अनुकूल असे घडत नाही असे दिसू लागल्यावर तिथून काढता पाय घेतला जातो. येथे उत्तीर्ण - अनुत्तीर्णचे सूत्र नसते. त्यामुळे आज इकडे तर उद्या तिकडे असे करणे नित्याचे होऊन बसते. मला नक्की समाजसेवा करायची आहे का ? हेच ज्यांचे नक्की नाही. आपला उपयोग केला गेला आणि आता बाजूला केले गेले. या गर्तेत स्वतः सापडलेले, शेतकरीच काय कोणाला काय न्याय मिळवून देणार ? हे स्वतःच पीडित आहेत. शेतकरी वर्गात मेहनत करून खाण्याची धमक आहे. राब राब राबून धान्य पिकवतात. यांच्यापैकी कुठलाच गुण नसणाऱ्यांची स्थिती 'तेलही गेले तुपही गेले हाती राहिले धुपाटने' अशी असते.

दिवाळी म्हटली की गोडाचे पदार्थ आलेच. त्याशिवाय दिवाळी अळणीच म्हणावी लागेल. बेसन, रवा, गुळ - साखर, मसाले इत्यादी घटकांचा समावेश त्यात असतो. या गोष्टी कोणामुळे बाजारात उपलब्ध होतात ? तर शेतकऱ्यांमुळेच. असे असताना शेतकरी वर्गाविषयी कृतज्ञता व्यक्त करणेही प्रथम कर्तव्य बनते. आगामी वर्षात लोकसभेच्या निवडणुका आहेत. त्यावेळी मोदींचाच पक्ष पुन्हा सत्तेत आला तर, पंतप्रधानांची पुढील दिवाळी 'जय जवान - जय किसान'मय असेल का ? **(लेखक सामाजिक, शैक्षणिक, तंत्रज्ञान, राजकीय, अर्थ, धार्मिक, कला, आंतरराष्ट्रीय घडामोडी, संरक्षण, कृषी आदी विविध विषयांचे विश्लेषक आहेत.)**

**- जयेश राणे**
मुंबई

# दिवाळी सणाचे महत्व कमी होत आहे



आधुनिक केसरी

प्राचीन काळापासून आपल्या भारत देशात विविध प्रकारचे सण उत्सव साजरे केले जातात आणि आपला भारत देश सणांचा देश म्हणून ओळखला जाणारा जगातील एकमेव देश आहे. आणि या देशात विविध धर्माचे लोक राहतात आणि प्रत्येक धर्माचे लोक आपापल्या संस्कृती व परंपरेनुसार सण उत्सव साजरे करतात. दिवाळी हा सण सगळ्यात मोठा व सलग पाच दिवस चालणारा एकमेव सण आहे. आणि या सणाला भारतात प्राचीन काळापासूनच विशेष महत्त्व दिले जाते. पण हल्ली पाहिले तर भारतीय लोक या सणाला पहिल्यासारखे म्हणावे तेवढे महत्व देत नाहीत. सणांचा राजा म्हटला जाणारा दिवाळी हा सण एकदिवस लयास जातो की काय? अशी पाल मनात चूकचूकतेय. पण सांगायचा मूद्दा काय तर, हल्ली दिवाळी सणाचे महत्व तर कमी होत आहेच पण याबरोबरच इतर सणांचेही महत्व कमी होताना दिसत आहे. हे आपण सर्वजण डोळ्यांनी पाहात आहोत. अनुभव घेत आहोत. परंतू पूर्वी दिवाळी सणाला वा पंचमी सणाला गावाकडे आनंदी वातावरण असायचे.सगळे गावकरी कसे आनंदात न्हाऊन निघायचे. प्रत्येक बापाची आपल्या लेकीला माहेरी आणण्यासाठी धांदल घाई असायची. त्यासाठी बापाला आधीपासूनच पैशाचा जोड लावून ठेवावा लागायचा. आपल्या लेकीला मनावर नवीकोरी साडी व लेकीच्या लेकरांना नवेकोरे कपडे खरेदी करण्यासाठी प्रत्येक बापाची मार्केटमध्ये तारांबळ असायची. तसेच फराळाचे साहित्य, आकाशकंदील व पणत्या बाजारातून खरेदी करायचे. बाजारपेठा लोकांच्या गर्दीने फुलून जायच्या. घरोघरी आनंद असायचा. लहान मुलांचा चिवचिवाट असायचा. नवेकोरे कपडे घालून व फटाके फोडून लहान थोर मंडळी मनसोक्त आनंद घ्यायचे. गावात ऐटीत व रुबाबात फिरायचे. परगावी कामानिमित्त नोकरीला असणारी मंडळी दिवाळीला हमखास गावाकडे यायची व गावकऱ्यांशी सुसंवाद साधायची. परंतु आता काळ बदलला. काळाच्या ओघात माणसे बदलली. माणसांच्या नितिमत्ता बदलल्या. माणूस स्वार्थी व मतलबी झाला.मायेचा ओलावा कमी झाला. एकत्र कुटुंब पद्धत विभक्त झाली. आणि माणूस रानटी जनावरांनसारखा व्यवहार करु लागला. आपली संस्कृती विसरुन बेभानपणे वागू लागला.या नादात सणांचे महत्व कमी होऊन बसले. आजकालचे लोक पहील्या एवढे दिवाळी सणाला महत्व देत नाहीत. पूर्वीसारखा दिवाळीला असणारा आनंद, जोश व उल्हास कमी होत चालला आहे. विशेष म्हणजे काही सुशिक्षित लोकांना तर आज सण आहे हे सुध्दा माहीत नसते. परंतु जुन्या अनपढ लोकांना सांगायची सुध्दा गरज पडत नाही.ते बरोबर ओळखतात की आज कोणता सण आहे ते. परंतू शिकलेली जणता इतकी जणता बेभान झाली आहे. तेव्हा जाता जाता समस्त जणतेला कळकळीची नम्र विनंती आहे की, दादांनो सण उत्सव साजरे करत जावा.सणांचे महत्व आपल्याला कळू द्या. आपल्या संस्कृतीचे जतन करा. मानवी जीवन पाण्यावरचा बुडबूडा आहे. ते कधी फुटेल याचा काही नेम नाही. म्हणून दिवाळी बरोबरच प्रत्येक सणाचा भरभरून आनंद घ्या. सण उत्सव थाटामाटात व ऐटीत साजरे करा. कारण ती आपली परंपरा आहे. आपल्या देशाला जगात एकमेव सणांचा देश म्हणून ओळखले जाते. सण उत्सव म्हणजे आपल्या देशाची आन बाण व शान आहे. इतर देशांत आपल्या देशाचा सणांच्या बाबतीत नावलौकिक आहे.तो कायम ठेवावा व दिवाळी सणाचे महत्व वाढवावे. नाहीतर एकदिवस सगळेच सण उत्सव नामशेष होतील. एवढे मात्र नक्की....

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
मू.पो.खंडाळी, ता. अहमदपूर
जिल्हा लातूर, मो.7498715661



# सावखेडा येथे महर्षी वाल्मिक ऋषी जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील सावखेडा येथे 28 शनिवार रोजी आद्यकवी महर्षी वाल्मीक रुषी जयंती उत्साह साहजिक करण्यात आली जिल्हा उपाध्यक्ष कैलास गायकवाड यांच्या हस्ते महर्षी वाल्मिक ऋषी यांच्या प्रतिमेस अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी तालुका उपाध्यक्ष अजिनाथ कणके यांनी उपस्थितीची संवाद साधत महर्षी वाल्मिक ऋषी जयंतीच्या शुभेच्छा दिल्या याप्रसंगी जिल्हा उपाध्यक्ष कैलास गायकवाड तालुका उपाध्यक्ष आजिनाथ कणके, अमोल कणके, सौरभ कणके, नीतीकेस कणके, अतिश कणके, बाळू कणके, राजू कणके, वाल्मीक अहिरे, राजेंद्र डाके, पोलीस पाटील सावखेडा नवनाथ नाके, संतोष गाडेकर, युवराज कणके, राजेंद्र कणके, सागर कनके, सावधान कणके, सुनील कणके आदि गावकऱ्यांची उपस्थिती होती.

# गरजूंनी मोफत नेत्र तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा : अमोल नरवाडे यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** अकोला येथील प्रसिध्द नेत्र तज्ञ तथा रेटीना सर्जन यांच्या वतीने नेत्र रोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबिराचे उद्घाटन आयआरएस अधिकारी समिर वानखेडे यांच्या हस्ते होणार असून,प्रख्यात नेत्र तज्ञ तथा रेटीना सर्जन डॉ. विक्रांत अनंत नरवाडे हे मोफत नेत्र तपासणी करणार आहेत. या शिबिराचा तालुक्यातील जास्तीत जास्त गरजूंनी लाभ घ्यावा असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते अमोल नरवाडे यांनी केले आहे.



रिसोड येथील दूरदर्शन केंद्रसमोर असलेल्या श्री वसंत हॉस्पिटल येथे दि.१७ नोव्हेंबर २०२३ रोजी सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात मोतीबिंदू तपासणी, नेत्र तपासणी, मधुमेह रुग्णांची नेत्र तपासणी, रेटीना आजाराचे निदान, वयोवृद्धांचे नेत्र आजार निदान व उपचार आणि मोफत औषधी देण्यात येणार आहे.तद्वतच, मोतीबिंदूवर शस्त्रक्रिया करावी लागली तर विशेष सवलत देण्यात येणार आहे.या संधीचा तालुक्यातील ग्रामीण भागातील तसेच शहरातील गरजूंनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन नरवाडे यांनी केले आहे.

दीपावलीच्या सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा!
# ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय, मेहगाव
ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर
सरपंच
श्रीमती रेखा गणेश बोंगाने
उपसरपंच
लक्ष्मीबाई पांडुरंग घुगे
ग्रामसेवक
एफ.आर. मुंडे
ग्रामपंचायत मेहगाव येथील सदस्य व कर्मचारी वर्ग
अंकुश घुगे, संगीता आव्हाड, मुकेश गायकवाड, लक्ष्मण घुगे, लताबाई घुगे, समाधान घुगे (शिपाई), प्रभाकर गिरी (पाणी पुरवठा), संजय सातदिवे (संगणक चालक)
स्वच्छ गाव, सुंदर गाव मेहगाव
परिसरातील नागरिकांनी वेळेवर नळपट्टी, घरपट्टी भरून ग्रामपंचायत कार्यालयास सहकार्य करावे
सन्माननिय ग्रामपंचायत पदाधिकारी व गाव समर्थक ज्येष्ठ व युवा पदाधिकारी हितचिंतक, मेहगाव, ता. कन्नड

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!
# लहू झालटे
सरपंच, ग्रामपंचायत तिवडी, ता. जळगाव जा

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!
# अनिल अंबडकर
ग्रामसेवक, ग्रामपंचायत दादुलगाव, पं.स.जळगाव जा.

दीपावली, पाडवा व भाऊबीजच्या सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा
# ग्रामपंचायत कार्यालय आवलगाव, तालुका घनसांगवी, जिल्हा जालना
काकासाहेब मुरलीधर कुऱ्हाडे (सरपंच)
श्री . बांगर साहेब (ग्रामविकास अधिकारी)
ऐतेशाम मोसीन बेग (उपसरपंच)
ग्रामपंचायत सदस्य :- मधुकर ठेंगडे, शमशेर शेख, बाळासाहेब दत्तू नीचळ, विठ्ठल भालेकर, आफ्रीन सीदिक बेग, कासाबाई कोरडे, द्वारकाबाई कौलांगे, ऑपरेटर महादेव थोरात, शिपाई विलास भालेकर, निसार शेख

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!
# विनोद ठोंबरे
मुख्याध्यापक, नामदार मुकुल वासनिक विद्यालय. आडोळ,बु,

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!
# पवन कृषी सेवा, नृसिंग ॲक्वा, नृसिंग ट्रेडर्स, नृसिंग सार्वजनिक वाचनालय, पाडळी, ता. खुलताबाद
नंदू काळे
भरत काळे

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!
# नाना पेट्रोलियम, वानेगाव फाटा, खुलताबाद रोड, फुलंब्री
दीपावलीनिमित्त आईलवर भव्य डिस्काऊंट
कृष्णा जाधव
कडूबा गाडेकर

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!
काशीनाथ जाधव
जिल्हाध्यक्ष शरद जोशी विचार मंच संघटना, म.रा.
देवराव आहेर
जिल्हा कोषाध्यक्ष छत्रपती संभाजीनगर
पंडित खरात
जिल्हा कार्याध्यक्ष छत्रपती संभाजीनगर

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!
# श्री सत्यनारायण रामविलासजी शर्मा
जिंतूर व्यापारी, महासंघ कोषाध्यक्ष

जननायक, क्रांतीसूर्य
बिरसा मुंडा
जयंती व
दीपावलीच्या सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा!
प्रशांत भाऊ बोडखे
संस्थापक अध्यक्ष भारतीय आदिवासी पँथर संघटना
गजानन प्रल्हाद कोकाटे
जिल्हाध्यक्ष, भारतीय आदिवासी पँथर संघटना, बुलढाणा

दीपावली, पाडवा व भाऊबीजच्या सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा
# नरसिंह कन्स्ट्रक्शन पाडळी
ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर
मा.श्री. अरुण पाटील आघाडे
(गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर)

श्री. रविंद्र दुर्गादास गायकवाड
मो.: ९९२३३३६४६३
९७६४२८७६७६
आपणास व आपल्या परिवारास दिपावली व लक्ष्मीपुजन निमित्त हार्दिक शुभेच्छा...
# महाबली ब्लास्टिंग
आमच्याकडे ५० फुट नवीन विहीर तसेच क्रेन व ब्लास्टिंग चे कामे केली जातील.
- संबंधीत फर्म -
शिवछत्र परिवार
शिवाई दुध उद्योग समुह
मु.पो. मोलखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)



शुभेच्छुक : ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय,बडोदबाजार,भालगाव,बडोद वाडी

दीपावलीच्या सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा!
जिल्हाध्यक्ष भाजपा
मा.श्री. सुहास भाऊ शिरसाट
विनित : भारतीय जनता पार्टी,फुलंब्री शहर व तालुका

दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!
# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार गट
मा. अजिनाथ पाटील भाऊ साळुंके
खुलताबाद तालुका युवक काँग्रेस अध्यक्ष

# ग्रामपंचायत येसगाव नं. दोन
ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर
दीपावली, पाडवा व भाऊबीजच्या सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा
सौ. रेणुका अरुण खंडागळे (मा. सरपंच)
मा. अरुण भाऊ खंडागळे (सामाजिक कार्यकर्ता)

दीपावली, पाडवा व भाऊबीजच्या सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा
# ग्रुप ग्रामपंचायत कनकशीळ/ इंदापूर
ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर
मा. संदीप भाऊ निकम पाटील (सरपंच)
कासाबाई आबाराव म्हस्के (सरपंच)
मा. सतीशसिंह मोहनसिंग पवार (ग्रामसेवक)
: सन्माननीय सदस्य :
सविता राणे, राम पोफले, अनिल वाघ, संदीप कामठे, शोभाबाई बोडखे, विमलबाई कामठे, लताबाई अशोकराव निकम